पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष । महिला । मुलांसाठी
आजच भेट द्या !
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली,अ.नगर
मो : 9881531536
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता!
Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of -
Ceramic Wall & Floor Tiles,
Vitrified Tiles, Paving Blocks,
Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २५.११.२०२६ | अंक नं. १९८ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/- प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/- चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनद्वारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

मुदतीनंतर ठेवींची रक्कम देण्यास टाळाटाळ केल्याने पतसंस्थेच्या मॅनेजरसह संचालकांवर गुन्हा दाखल

सराफ व्यापाऱ्याने दिली फिर्याद, अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एका पतसंस्थेत ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या

श्रीरामपूर – अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एक नागरी पतसंस्थेत ठेवीदारांची लाखो रूपयांची फसवणूक केली म्हणून सराफ व्यापारी शांतिलाल लखमीचंद पोरवाल (रा. मेनरोड, श्रीरामपूर) यांच्या फिर्यादीवरून कोर्टाच्या आदेशान्वये श्रीरामपुरातील महर्षी नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, शांतिलाल पोरवाल यांनी श्रीरामपूर येथील जिल्हा सत्र न्यायालयात याबाबत फिर्याद दाखल केली होती. कोर्टाच्या आदेशान्वये श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात महर्षी नागरी पतसंस्थेचे मॅनेजर, व्हा.चेअरमन विजय मूळशंकर सेवक (रा. जिजामाता चौक रा. नेवासारोड, श्रीरामपूर), संचालक गितेश श्रीराम जोशी (रा. हनुमान सोसायटी, नेवासा रोड, श्रीरामपूर), नवनीत पांडुरंग जोशी (रा. गोंधवणी, श्रीरामपूर), सुशील विजय गांधी (रा. जिजामाता चौक, श्रीरामपूर), गणेश गंगानाथ देशपांडे (रा. बेलापूररोड, श्रीरामपूर), रणजित रमेश वैदय (रा. मेनरोड, श्रीरामपूर), श्रीमती मंगल मुरलीधर क्षिरसागर (रा. वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर), श्रीमती कांचन अभिजीत मुळे (रा. बेलापूररोड, श्रीरामपूर), श्रीमती विद्या अरूण क्षिरसागर (रा. सूतगिरणीरोड, श्रीरामपूर) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोरवाल यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी हे पतसंस्थेचे कामकाज पाहत होते. फिर्यादीशी असलेल्या परिचयाचा फायदा घेत आरोपींनी फिर्यादीस विश्वास व भरोसा दिला. तुमची रक्कम कधीही बुडू शकत नाही, आमच्या पतसंस्थेचे भाग भांडवल खुप मोठ्या प्रमाणावर आहे, असे म्हटल्याने फिर्यादीने आरोपींनी दिलेल्या विश्वास व भरोशास मान देवून आरोपींच्या पतसंस्थेत ठेव ठेवण्याची तयारी दर्शवून मुदत ठेव पावत्या ठेवल्या. त्याचे कॅश सर्टिफिकेट आरोपींनी दिले. सदर ठेव पावत्यांची मुदत संपल्यानंतर फिर्यादी व त्यांच्या पत्नी बहिण, भाचा, मित्र यांच्या नावे असलेल्या पावत्या मॅच्युरिटीनंतर वेळोवेळी पतसंस्थेत जावून पावत्यातील रक्कमेची मागणी केली मात्र थोडे थांबा, पतसंस्था अडचणीत आहे, तुम्ही सहकार्य करा अशी विनंती आरोपींनी केली.

फिर्यादीच्या बहिणीच्या कर्करोगाच्या उपचारासाठी पैसे आवश्यक असल्याने अनेकदा आरोपींकडे पैशांची मागणी करूनही त्यांनी रक्कम परत देण्यास टाळाटाळ केली, रक्कम परत दिली नाही. त्यामुळे फिर्यादीची फसवणूक करून त्याचा विश्वासघात केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोरवाल यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात एमपीआयडी कायद्याचे कलम ३, ४,७ व ८ आणि बीएनएस कलम ३१८ (४) अन्वये जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. रामचंद्र शिखरे हे करीत आहेत.



अहिल्यानगर – छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या कडेला एच.पी पेट्रोल पंपाजवळील व मिरावली बाबा कमान जवळ वारूळवाडी हद्दीत कचऱ्याचे ढीग साचले असून या महामार्गावरून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना मोठ्या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. येथे कचरा जाळला जात असल्यामुळे प्रदूषणाची समस्याही निर्माण होत आहे. संबंधीतांवर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी येथील नागरिक करत आहेत. (छायाचित्र : महावीर पोखरणा)

पुण्यातील शिवाजीनगर कोर्टासमोर गोळीबार

पुणे – पुण्यातील शिवाजीनगर कोर्टासमोर गोळीबार झाल्याची घटना २५ नोव्हेंबर रोजी घडली. यात एक जण गंभीर जखमी झाला आहे. फायर केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार एकूण सहा जण होते. कोयते आणि बंदूका घेऊन आरोपी आले होते, या ठिकाणी मोठ्या प्रमाणावरती गर्दी असते, अशा गर्दीच्या वेळी ही घटना घडली आहे. यामध्ये दोन व्यक्ती जखमी झाल्याची माहिती आहे. घटना घडल्यानंतर पोलिस काही क्षणातच घटनास्थळी दाखल झाले. एका गाडीवरती तिघे तर दुसऱ्या गाडीवरती चौघे जण आलेले होते, मोठी गर्दी होती, कोणीही वाचवायला पुढे गेलेले नाहीत, त्या आरोपींकडे कोयते आणि बंदूका होत्या, त्यामुळे परिसरात एकच भीती पसरली, पोलिस आणि फॉरेन्सिकची टीम घटनास्थळी दाखल झाली. घटनास्थळावर एक पिस्तुल आणि काडतुसांनी भरलेली मॅगझीन सापडली आहे. कोर्टाच्या आवारात उभ्या असलेल्या वकिलांनी सांगितले की, याठिकाणी एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याला पोलिसांनी रिक्षात टाकून रुग्णालयात नेले. हा व्यक्ती कोण आहे, हे अद्याप समजू शकलेले नाही.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २६ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन

बेमुदत संपाचा इशारा; शासनाच्या आश्वासनांना कंटाळले शिक्षकेतर कर्मचारी; अहिल्यानगरमधील महाविद्यालयांतील कर्मचारीही आंदोलनात उतरणार

नगर – राज्यातील विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या न्याय्य मागण्यांबाबत शासनाकडून अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. विविध मागण्यांवर शासनाकडून वारंवार आश्वासने दिली जात असली, तरी प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संयुक्त कृती समितीने आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २६ नोव्हेंबर रोजी राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्यात येणार असून, या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार आहेत. त्यानंतरही शासनाने मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष वैभव रोडी, उपाध्यक्ष बाळासाहेब इधे आणि सचिव संतोष कानडे यांनी दिली.

विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचारी शैक्षणिक व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहेत. विद्यार्थ्यांचे प्रवेश, परीक्षा, निकाल, प्रशासकीय कामकाज, ग्रंथालये आणि प्रयोगशाळांचे कामकाज सुरळीत ठेवण्यात या कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. मात्र, या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस निर्णय होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर अनुज्ञेय असलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तातडीने लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच सन २००५ पूर्वी भरती प्रक्रिया सुरू अथवा पूर्ण झालेल्या आणि त्यानंतर सेवेत रुजू झालेल्या अनुदानित कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील रिक्त असलेल्या शिक्षकेतर पदांच्या भरतीस शिक्षक पदभरतीप्रमाणे तातडीने मंजुरी द्यावी, अशी कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असून, प्रशासकीय कामकाजावरही त्याचा परिणाम होत असल्याची भूमिका संघटनेने मांडली आहे.

अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करावा, महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्रयोगशाळा तसेच ग्रंथालय परिचरांना कालबद्ध पदोन्नतीमध्ये ४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाची स्थापना करावी, अशी मागणीही संयुक्त कृती समितीने केली आहे. या मागण्यांबाबत शासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊन पाठपुरावा करण्यात आला आहे. मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. केवळ आश्वासनांवर समाधान न मानता आता प्रत्यक्ष शासन निर्णय निर्गमित होणे आवश्यक असल्याची भूमिका कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.

प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी २६ नोव्हेंबरला राज्यव्यापी कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होणार आहेत. आंदोलनानंतरही शासनाने मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास पुढील टप्प्यात बेमुदत संप पुकारण्यात येईल, असा इशारा संयुक्त कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व विद्यापीठांचे शिक्षकेतर कर्मचारी व अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे-पाटील, महासचिव रावसाहेब त्रिभुवन, कार्याध्यक्ष विजयकुमार घरत, संयुक्त कृती समितीचे प्रमुख अजय देशमुख आदी पदाधिकारी सहभागी होणार आहेत. प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.



एमआयडीसीतील कंपनीच्या कार्यालयाचे कुलूप तोडून रोकड व चांदीचे नाणे लंपास

नगर – एमआयडीसी परिसरातील एका कंपनीच्या कार्यालयाचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रक्कम आणि चांदीचे नाणे चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत वेदांत विलास छिंदम (वय ३२, धंदा – खाजगी नोकरी एचआर, रा. सुराणा बिल्डिंग शेजारी, तोफखाना, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. १९ नोव्हेंबर रोजी रात्री ८ ते २० नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान एमआयडीसी अहिल्यानगर येथील 'इपीटॉम कंपोनंट्स जी-१७' या कंपनीतील सीईओ यांच्या कार्यालयाचे तसेच कंपनी मालकाच्या कार्यालयाचे कुलूप कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडले. कार्यालयात प्रवेश करून चोरट्याने रोख रक्कम आणि चांदीचे नाणे असा एकूण ९० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी वेदांत छिंदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून २४ नोव्हेंबर रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरट्यागुन्हा नोंदवण्यात आला आहे.

Turn Data into Insights and Build a Smarter Future!
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
CERTIFICATE COURSE IN
DATA ANALYST
100% JOB Assistance
MASTER INDUSTRY-RELEVANT TOOLS
EXCEL Data Analysis & Automation
POWER BI Interactive Dashboards
SQL Data Querying & Management
PYTHON Data Analysis & Scripting
TABLEAU Data Visualization
ENROLL NOW!
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टँड शाखा
अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुचा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

।।दशक्रिया विधी।।

सुसंस्कार ... सुविचारांचा वारसा
आमच्या पाठीशी आहे...
स्मृती सुगंध आपल्याच आदर्शत्वाचा
आजही दरवळत आहे...
आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रद्धांजली
स्व.गं.भा. सुमन रोहिदास ताठे
दशक्रिया विधी
गुरुवार दि. २६/११/२०२६ रोजी सकाळी ८.०० वा.
नागरदेवळे अमरधाम येथे होईल

प्रवचन सेवा- युवा किर्तनकार हभप ओंकार महाराज बाबर पिंगोर, अहिल्यानगर
-दुःखित-
दिलीप विनायकराव ताठे
ताठे, शेलार व रासकर परिवार

पगडी रस्म

स्व. दौलत तलरेजा
सभी को सुचित करते है कि, दौलत (राजूसेठ) बोधाराम तलरेजा
इनका मंगलवार ता. २४/११/२०२६ को स्वर्गवास हुआ है ।
* पगडी रस्म *
गुरुवार ता. २६/११/२०२६ को,
समय : शाम ५ से ५.३० बजे तक,
स्थान : कृपाल आश्रम, मिस्कीन रोड, अहिल्यानगर
- शोकाकूल -
समस्त तलरेजा परिवार तथा रिश्तेदार
फर्म : साईबाबा लाईट हाऊस,
चित्रा टॉकीज के पास,अहिल्यानगर, मो : 9850136733

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन – २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

रघुनाथ कुलट यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – कुलटवाडी खातगाव टाकळी येथील रहिवासी रघुनाथ रभाजी कुलट (वय ९२) यांचे २५ नोव्हेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. अंत्यसंस्कार राहत्या घरी कुलटवाडी, खातगाव टाकळी येथे करण्यात आले.

त्यांच्या मागे दोन मुले, चार मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बबन व लिलाधर यांचे वडील होत.

कुशल कांबळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सौरभ कॉलनी, विनायकनगर येथील रहिवासी कुशल कचरू कांबळे (वय ३०) यांचे २५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे आई-वडील, तीन बहिणी असा परिवार आहे.

त्याच्या पार्थिवावर चितळी-पाडळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

ज्योतीताई तिरमल यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भिस्तबाग चौकातील रहिवासी सौ. ज्योतीताई विलास तिरमल (वय ४४) यांचे २५ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, आई, १ मुलगा, १ मुलगी, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. विलास तिरमल यांच्या पत्नी, प्राची, हार्दिक यांच्या मातोश्री होत.

विजयसिंग परदेशी यांचे हृदयविकाराने निधन



नगर – भराडगल्ली येथील रहिवासी, तोफखाना मित्र मंडळाचे मार्गदर्शक विजयसिंग (भाऊ) किसन परदेशी (वय ८४) यांचे २५ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी नगराध्यक्ष कै. पै. किसनसिंग परदेशी यांचे चिरंजीव, प्रताप व रणजीत परदेशी यांचे वडील होत.

दौलत तलरेजा यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चित्रा टॉकीज जवळील साईबाबा लाईट हाऊस या फर्मचे संचालक दौलत बोधाराम तलरेजा (वय ६४) यांचे २४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, २ विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

माधवराव ससाणे यांचे वृद्धापकाळाने निधन



राहाता – येथील मुळा – प्रवराचे माजी संचालक माधवराव हरिभाऊ ससाणे (वय ९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, चार मुले, सुना, पुतणे, नातवंडे , पतवंडे असा परिवार आहे. ममदापूर येथील शेतकरी किसन व निशिकांत ससाणे यांचे थोरले बंधू, रयत शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त प्राध्यापक किशोर ससाणे, पांडुरंग, नवनाथ व शरद ससाणे यांचे वडील होत.

तुकाराम जाधव यांचे अल्प आजाराने निधन



नगर – साबलखेड येथील रहिवासी तुकाराम मारुती जाधव (वय ८०) यांचे २४ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर साबलखेड अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, पत्नी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मीराबाई खोले यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील मीराबाई मुकुंदराव खोले (वय ८२) यांचे २४ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रमेश, रामराव व राजेंद्र खोले यांच्या भावजई, गणेश खोले, नाना, सोमनाथ व सागर खोले यांच्या चुलती होत.

जयेंद्र काला यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – गणेशनगर येथील विजय प्रोव्हिजनचे मालक जयेंद्र विजयचंद काला (वय ६४) यांचे २४ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, तीन भाऊ, बहिण, मुलगा, मुलगी, सुन, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणेशनगर येथील वर्धमान पतसंस्थेचे चेअरमन व वाकडीरोड येथील संकेत नर्सरीचे संचालक राजकुमार रायचंद काला यांचे पुतणे, रुपेंद्र, कैलास व आनंद काला यांचे थोरले बंधू, विक्रांत, ऋषभ, ऋतुज, आदित्य, रयन व सार्थक काला यांचे चुलते, संकेत काला व छत्रपती संभाजीनगर येथील सौ.स्नेहा अभिषेक पाटणी यांचे वडील होत.





सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात कथित खोटे तक्रार अर्ज दाखल करणे आणि त्या अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्यासाठी खातेनिहाय चौकशा लावण्याच्या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या निषेधार्थ जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर ढोल-ताशांच्या गजरात जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त आंदोलकांनी खोट्या तक्रारी आणि चौकशीच्या प्रतींची होळी करून प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदविला.

जिल्हा उपनिबंधकांच्या कारभाराविरोधात ढोल-ताशांच्या गजरात निदर्शने; तक्रारी व चौकशीच्या प्रतींची केली होळी, प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध

कर्मचाऱ्यांना संरक्षण द्या, अन्यथा आंदोलन तीव्र आंदोलनाचा इशारा

नगर – माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळवून सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात कथित खोटे तक्रार अर्ज दाखल करणे आणि त्या अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देण्यासाठी खातेनिहाय चौकशा लावण्याच्या प्रकाराचा महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब महासंघाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या निषेधार्थ शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागील बाजूस असलेल्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयासमोर ढोल-ताशांच्या गजरात निदर्शने करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी खोट्या तक्रारी आणि चौकशीच्या प्रतींची होळी करून प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा निषेध नोंदविला.

या आंदोलनात महासंघाचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे, वसंत थोरात, के. के. जाधव, सुहास धीवर, ना. म. साठे, भाऊसाहेब सिनारे, अश्विनी खरपुडे, ज्योती हराळे, सुरेश बनसोडे, डॅनियल पारधे, भारती रोहकले यांच्यासह सहकार विभागातील कर्मचारी सहभागी झाले होते.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासापासून संरक्षण देणे, त्यांना सुरक्षित वातावरणात काम करता यावे यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, हे संबंधित कार्यालयप्रमुखांचे प्राथमिक कर्तव्य आहे. मात्र, कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याऐवजी जिल्हा उपनिबंधकांकडून त्यांच्याच विरोधात खातेनिहाय चौकशा लावल्या जात असल्याचा आरोप महासंघाने केला आहे. तसेच विविध तक्रार अर्जांच्या आधारे कर्मचाऱ्यांकडून लेखी खुलासे मागविणे, जबाब नोंदविणे आणि प्रशासकीय प्रक्रियांचा वापर करून त्यांना मानसिक त्रास दिला जात असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे. कर्मचाऱ्यां मध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून कार्यालयातील कामकाजाचे वातावरणही अस्वस्थ बनले आहे. बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या कथित त्रासाला आळा घालण्याऐवजी कर्मचाऱ्यांनाच चौकशीच्या प्रक्रियेत अडकविले जात असल्याने महासंघाने नाराजी व्यक्त केली.

जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी बाहेरील व्यक्तींकडून होणाऱ्या त्रासासंदर्भात पोलीस खात्याकडे लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. या तक्रारींची माहिती जिल्हा उपनिबंधकांना देऊन संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस संरक्षण मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणीही करण्यात आली होती. यासंदर्भात महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा उपनिबंधकांशी प्रत्यक्ष चर्चा केली होती. मात्र, वारंवार मागणी करूनही या प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झाल्याचे महासंघाला कळविण्यात आलेले नाही. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांमधील नाराजी अधिक तीव्र झाल्याचे राज्याध्यक्ष एन. एम. पवळे यांनी सांगितले.

या आंदोलनाच्या माध्यमातून महासंघाने प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहकार विभागातील कर्मचाऱ्यांविरोधात नियमबाह्य पद्धतीने सुरू करण्यात आलेल्या खातेनिहाय चौकशा तातडीने रद्द कराव्यात, चुकीची माहिती देऊन अथवा तक्रार अर्जांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांना त्रास देण्याचे प्रकार त्वरित थांबवावेत, तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यामार्फत आवश्यक संरक्षण मिळवून द्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या.

सहाय्यक सहकारी अधिकारी डी. डी. पारधे आणि वरिष्ठ लिपिक ए. पी. खरपुडे यांनी २१ सप्टेंबर २०२६ रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याची योग्य पद्धतीने चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी आवश्यक कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. तसेच या प्रक्रियेत प्रशासनाने पूर्ण सहकार्य करावे, अशी मागणीही महासंघाने केली आहे.

गुरुनानक जयंतीनिमित्ताने २९ डिसेंबर रोजी भंडारा

नगर– शीख धर्माचे संस्थापक गुरु नानक देवजी यांच्या ५५७ व्या जयंतीनिमित्त २९ डिसेंबर रोजी दुपारी १ ते ४ या वेळात सिंधी कॉलनीतील राधाकिसन चैतन्यदास धर्मशाळा येथे भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लालचंद उदासी यांनी दिली.

प्रकाश गुरुपुरबच्या निमित्ताने शहरातील विविध भागांतून दररोज सकाळी प्रभात फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेऱ्यांमध्ये मोठ्या संख्येने संगत सहभागी झाली होती.

गुरुबाणीचे गायन आणि वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरु नानकच्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले. पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या प्रभात फेऱ्यांमधून गुरुनानक देवजी यांच्या विचारांचा आणि शिकवणुकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. धार्मिक कार्यक्रमांसोबतच रक्तदान, लंगर सेवा आणि सामाजिक संस्थेचा गौरव अशा उपक्रमांमुळे यंदाचा प्रकाश गुरुपुरब सोहळ्यात सेवा, समता, त्याग आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

सोने-चांदीच्या दरात घसरण सुरूच

नगर – राज्यासह देशभरातील सराफ बाजारात आणि वायदा बाजारात २५ नोव्हेंबर रोजी सोने व चांदीच्या दरात घसरण नोंदवण्यात आली आहे. स्थानिक सराफ माहितीनुसार, जळगावमध्ये सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम ३,५०० रुपयांची आणि चांदीच्या दरात प्रति किलो ८,००० रुपयांची घट झाली आहे. जळगावात २४ कॅरेट सोने १,२२,००० रुपये आणि २२ कॅरेट सोने १,११,७५० रुपये प्रति १० ग्रॅमवर आले आहे, तर चांदी १,४८,००० ते १,४९,००० रुपये प्रति किलोवर आली आहे.

मुंबईमध्ये २४ कॅरेट सोन्याचा दर प्रति ग्रॅम १२,४५८ रुपये (१० ग्रॅमसाठी १,२४,५८० रुपये), २२ कॅरेट प्रति ग्रॅम ११,४२० रुपये आणि १८ कॅरेट प्रति ग्रॅम ९,३४४ रुपये आहे. चांदीचा दर प्रति किलो १,६५,००० रुपये आहे. वायदे बाजारात एमसीएक्सवर सोने ५३३ रुपयांनी घसरून १,२१,७९६ रुपये प्रति १० ग्रॅमवर आले. तर एम सीएक्सवर चांदी ०.४६% म्हणजेच ६६५ रुपयांनी कमी होऊन १,४४,७७३ रुपये प्रति किलोवर आली. आंतरराष्ट्रीय बाजारातही सोने व चांदीच्या किमतीत नरमाई दिसून येत आहे.

दिव्यांगांच्या हक्कांसाठी विळदघाट येथे २६ नोव्हेंबर रोजी विशेष कार्यशाळा

कायदेशीर पालकत्व आणि 'निरामय' आरोग्य विमा योजनेबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शन; संविधान दिनानिमित्त आयोजन

नगर – दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना आरोग्य सुरक्षेचे कवच मिळावे आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा, या उद्देशाने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचालित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट यांच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी), विळदघाट येथे ही कार्यशाळा होणार आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. मात्र, योजनांची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत आणि प्रशासकीय प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. विशेषतः ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांपर्यंत या योजनांची माहिती पोहोचविणे, त्यांच्यामध्ये जनजागृती निर्माण करणे आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यशाळेत 'दिव्यांगांसाठी सर्वकाही' या पुस्तकाचे लेखक तथा महाराष्ट्र राज्य दिव्यांग आर्थिक विकास महामंडळ, मुंबईचे सेवानिवृत्त महाव्यवस्थापक नंदकुमार फुले हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. आपल्या प्रदीर्घ प्रशासकीय अनुभवाच्या आधारे ते दिव्यांग व्यक्तींचे कायदेशीर हक्क, पालकत्वासंबंधी कायदेशीर तरतुदी, आरोग्य विमा योजना आणि त्यासंबंधित प्रक्रियांविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

दिव्यांग व्यक्तींच्या पालकांसमोर त्यांच्या पश्चात पाल्याची काळजी कोण घेणार, त्याच्या आर्थिक व कायदेशीर हितांचे संरक्षण कसे होणार आणि आवश्यक निर्णय घेण्यासाठी त्याला योग्य सहाय्य कसे उपलब्ध होणार, असे अनेक प्रश्न असतात. राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९ आणि दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ यांमधील तरतुदींच्या अनुषंगाने कायदेशीर पालकत्व तसेच निर्णयप्रक्रियेसाठी आवश्यक सहाय्याबाबत कार्यशाळेत माहिती दिली जाणार आहे.

कायदेशीर पालकत्वाची आवश्यकता कोणत्या परिस्थितीत भासते, त्यासाठी अर्ज कसा करावा, स्थानिक स्तर समितीची भूमिका काय असते, कोणती कागदपत्रे आवश्यक असतात आणि कायदेशीर पालकाच्या जबाबदाऱ्या कोणत्या, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. या प्रक्रियेत दिव्यांग व्यक्तीची इच्छा, स्वायत्तता, प्रतिष्ठा, गोपनीयता आणि कायदेशीर हक्कांचा सन्मान राखण्याचे महत्त्वही अधोरेखित केले जाणार आहे.

याशिवाय, राष्ट्रीय न्यासामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'निरामय' आरोग्य विमा योजनेची माहितीही या कार्यशाळेत दिली जाणार आहे. स्वमग्नता (ऑटिझम), प्रमस्तिष्क पक्षाघात, बौद्धिक दिव्यांगत्व आणि बहुविकलांगता असलेल्या पात्र व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येतो. योजनेच्या प्रचलित अटी व नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना एक लाख रुपयांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध होऊ शकते.

या विमा संरक्षणामध्ये निर्धारित मर्यादेनुसार रुग्णालयातील उपचार, औषधे, वैद्यकीय तपासण्या, पात्र शस्त्रक्रिया, दंत आरोग्य सेवा, नियमित उपचारात्मक थेरपी, आयुष उपचार आणि वाहतूक खर्चाचा समावेश आहे. विमा लाभ खर्च प्रतिपूर्ती पद्धतीने दिले जातात. योजनेसाठी आवश्यक पात्रता, नोंदणी, नूतनीकरण, कागदपत्रांची पूर्तता आणि विमा दावा सादर करण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूतीची नव्हे, तर समान संधी, आरोग्य सुरक्षा, आवश्यक सहाय्य आणि त्यांच्या हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज आहे. शासनाच्या कल्याणकारी योजना आणि पात्र लाभार्थी यांच्यातील माहितीची दरी कमी करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक आहे. संविधान दिनाच्या औचित्याने आयोजित ही कार्यशाळा समानता, सामाजिक न्याय आणि मानवी प्रतिष्ठा या संविधानिक मूल्यांच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

दिव्यांग व्यक्ती, त्यांचे पालक, काळजीवाहक, विशेष शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत संस्था तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील गरजू कुटुंबीयांनी या कार्यशाळेत सहभागी होऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

रिक्षासाठी पैशांची मागणी व छळास कंटाळून तरुणीची आत्महत्या; गुन्हा दाखल

नगर – रिक्षा घेण्यासाठी आई-वडिलांकडून पैसे आणण्याची मागणी करून मारहाण व छळ केल्याच्या त्रासाला कंटाळून १९ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मानसी संजय ढवळे (वय १९)असे मयत तरुणीचे नाव आहे. ही घटना २० नोव्हेंबर रोजी वारुळाचा मारुती येथील मुन्सिपल कॉलनी परिसरात घडली.

या प्रकरणी संजय बापू ढवळे (वय ४५, व्यवसाय चालक, रा. चौरे मळा, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. आरोपी विशाल आप्पा साठे (मूळ रा. साठे वस्ती, माळीवाडा, हल्ली रा. मुन्सिपल कॉलनी, वारुळाचा मारुती, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने पीडित तरुणीशी प्रेमसंबंध प्रस्थापित करून तिच्यासोबत राहत असताना रिक्षा खरेदीसाठी तुझ्या आई-वडिलांकडून पैसे आण, असा तगादा लावला. पैसे न दिल्याने आरोपीने तिला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली.

लग्नाचे आमिष दाखवून लग्न न करता आरोपीने तिचा मानसिक व शारीरिक छळ केला. आरोपीने तिला सलग आठ-आठ दिवस उपाशी ठेवून छळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या सततच्या छळाला आणि त्रासाला कंटाळून तरुणीने २० नोव्हेंबर रोजी गळफास घेऊन जीवन संपवले.

आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी २४ नोव्हेंबर रोजी रात्री आरोपी विशाल आप्पा साठे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८, ११५(२) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

'महात्मा ज्योतीराव फुले' यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा वेशीवरील पुतळा परिसरात मंडप उभारावा

स्वच्छता, मंडप व माईक व्यवस्थेची मागणी : आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन

नगर – थोर समाजसुधारक, सत्यशोधक विचारांचे प्रणेते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त २८ नोव्हेंबर रोजी माळीवाडा वेस येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी महानगरपालिकेने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई-महात्मा ज्योतिराव फुले कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते, पंडित खरपुडे आणि ऋषिकेश चव्हाण यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले.



'महात्मा ज्योतीराव फुले' यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा वेशीवरील पुतळा परिसरात मंडप उभारावा आदी मागण्यांचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना प्रा. माणिकराव विधाते, पंडीतराव खरपुडे, ऋषीकेश चव्हाण.

महात्मा ज्योतिबा फुले यांची २८ नोव्हेंबर रोजी पुण्यतिथी असून, या दिवशी शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांतील कार्यकर्ते तसेच नागरिक माळीवाडा वेशीवरील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतात. त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती असते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने पुतळा परिसराची स्वच्छता करून तेथे मंडप उभारावा, तसेच अभिवादन कार्यक्रमासाठी माईक व ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करावी, अशी मागणी समितीने निवेदनातून केली आहे.

महात्मा फुले यांनी समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांच्या उन्नतीसाठी आयुष्यभर संघर्ष केला. स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, जातिभेद निर्मूलन आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी त्यांनी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या विचारांचा जागर आणि कार्याचे स्मरण करण्यासाठी पुण्यतिथीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमाला विशेष महत्त्व असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पुण्यतिथीच्या दिवशी शहरातील अनेक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. त्यामुळे कार्यक्रमस्थळी गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने वेळेत नियोजन करणे आवश्यक आहे. पुतळा परिसर स्वच्छ व सुशोभित करणे, मंडप उभारणे आणि माईक व्यवस्था उपलब्ध करून देणे या मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, असे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

गृहिणी

आरोग्य

पोटाच्या तक्रारींवर उपाय

पोटाच्या तक्रारी म्हणजे फक्त एकच आजार नसतो तर अनेक लहान मोठ्या कारणांमुळे होणारा त्रास असतो, त्यात साधारणपणे ॲसिडिटी, जळजळ, पोट फुगणे, गॅस होणे, ढेकर येणे, भूक न लागणे, मलावरोध म्हणजे पोट साफ न होणे, जुलाब लागणे, पोटात दुखणे, मळमळणे आणि कधी कधी उलट्या होणे हे सगळे येते. हा त्रास बहुतेक वेळा चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयींमुळे होतो, जसे की वेळा चुकवून जेवणे, तेलकट, तिखट, मसालेदार, बाहेरचे, जंक फूड जास्त खाणे, एकाच वेळी खूप जास्त जेवणे, जेवताना घाई करणे, चांगले न चावता गिळणे, रात्री उशिरा जेवणे आणि जेवत जेवत लगेच झोपणे. त्यासोबत कमी पाणी पिणे, दिवसभर एकाच जागेवर बसून राहणे, चालणे फिरणे नसणे, झोप पूर्ण न होणे, मानसिक ताण, चिंता आणि राग यामुळे सुद्धा पोटावर परिणाम होतो, कारण पोट आणि मन यांचा खूप जवळचा संबंध असतो आणि मानसिक ताण असेल तर पोट लवकर बिघडते. काही वेळेस अँटिबायोटिक्स, पेनकिलर सारख्या औषधांमुळे, चांगले बॅक्टेरिया कमी झाल्यामुळे किंवा जंत, इन्फेक्शन, पित्ताचा खडा, अल्सर सारख्या कारणांमुळे सुद्धा पोटाच्या तक्रारी वाढू शकतात, म्हणून त्रास वारंवार होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नये.उपाय म्हणून सगळ्यात आधी जेवणाची वेळ नियमित ठेवावी, सकाळी उठल्यावर कोमट पाणी प्यावे, दिवसभरातून थोडे थोडे करून पुरेसे पाणी प्यावे, जेवणात हिरवी भाजी, फळे, कोशिंबीर, दही, ताक, डाळ, भाकरी यांचा समावेश करावा, तेलकट, तिखट, आंबट, तळलेले, मैद्याचे पदार्थ, कोल्ड्रिंक, चहा कॉफी, दारू आणि तंबाखू शक्य तितके टाळावेत, जेवणानंतर लगेच झोपू नये, थोडे चालावे, रात्रीचे जेवण हलके आणि लवकर घ्यावे, जेवणाआधी आणि नंतर अर्धा तास जास्त पाणी पिऊ नये, जेवताना शांतपणे बसून चांगले चावून जेवावे, रोज किमान अर्धा तास चालणे, हलका व्यायाम किंवा योगा करावा, विशेषतः पवनमुक्तासन, वज्रासन, भुजंगासन सारखी आसने पोटासाठी चांगली मानली जातात.

पाककला

पनीर कुरकुरीत

साहित्य : पनीर २५० ग्रॅम, कॉर्नफ्लोअर ३ चमचे, मैदा २ चमचे, तांदळाचे पीठ १ चमचा, आले-लसूण पेस्ट १ चमचा, लाल तिखट १ चमचा, हळद १/४ चमचा, गरम मसाला १/२ चमचा, चाट मसाला १/२ चमचा, काळी मिरी पावडर १/४ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा, लिंबाचा रस १ चमचा, ब्रेड क्रम्स १ वाटी, तळण्यासाठी तेल

कृती : पनीरचे लांबट, जाडसर तुकडे करून घ्या. एका भांड्यात कॉर्नफ्लोअर, मैदा, तांदळाचे पीठ, आले-लसूण पेस्ट, लाल तिखट, हळद, गरम मसाला, मीठ आणि थोडे पाणी घालून घट्टसर पेस्ट तयार करा. त्यात लिंबाचा रस आणि कोथिंबीर घालून मिसळा. पनीरचे तुकडे या मिश्रणात घोळवून १० मिनिटे ठेवा. नंतर प्रत्येक तुकडा ब्रेड क्रम्समध्ये घोळवून सर्व बाजूंनी नीट लावा. कढईत तेल मध्यम आचेवर गरम करा. त्यात पनीरचे तुकडे सोडा. मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी खरपूस आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळा. तयार कुरकुरीत पनीर टिश्यू पेपरवर काढा. त्यावर चाट मसाला आणि काळी मिरी पावडर भुरभुरा.

वास्तू

या वस्तू घरात नकोत

* घरात बंद पडलेले इलेक्ट्रॉनिक सामान, तुटलेली भांडी, फाटलेले कपडे अजिबात ठेवू नयेत, या वस्तू राहूची नकारात्मकता वाढवतात आणि घरात आजारपण आणतात.

देवघरकधीहीबेडरूममध्ये,शौचालयाच्या भिंतीला लागून किंवा जिन्याखाली बनवू नये. देवघरात दोन शिवलिंग, तीन गणपती किंवा दोन शंखपूजा ठेवू नयेत.

सौंदर्य

* कांद्याच्या रसाने टाळूला मसाज केल्यास नवीन केस येतात.

* हातांची नखे वाढवू नयेत आणि लिंबाने घासून स्वच्छ ठेवावीत.

सल्ला

* खोबरे जास्त दिवस टिकण्यासाठी फ्रिजरमध्ये ठेवा तसेच चपातीचा डबा गरम असताना बंद करू नका.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, मृग १७।४७, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३३ मि.

राशिभविष्य

मेष : आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

वृषभ : कामाच्या ठिकाणी तणाव जाणवेल.

मिथुन : प्रवास योग आहे. नवीन ओळखी होतील.

कर्क : पैशांची आवक वाढेल. कुटुंबात मतभेद संभवतात.

सिंह : मान-सन्मान वाढेल. खर्चात वाढ होईल.

कन्या : नोकरीत बदलाचे संकेत आहेत. आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.

तूळ : प्रेम संबंधात गोडवा राहील. व्यवसायात फायदा होईल.

वृश्चिक : अडकलेली कामे पूर्ण होतील. मानसिक थकवा जाणवेल.

धनु : भाग्याची साथ मिळेल. स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

मकर : जमिनीच्या व्यवहारात लाभ होईल. वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

कुंभ : मेहनतीचे फळ मिळेल. संध्याकाळी शुभ वार्ता मिळेल.

मीन : कलाक्षेत्रात प्रगती होईल. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल.

शब्दगंध क्र. ७५६३ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द : - १) धन; संपत्ती; वित्त ३) ओढाओढ ५) भुतांचा राजा ६) कापडी भिंत; पटल ८) डोंगरातील खबदड १०) लाकूड वगैरे चिरण्याकरिता मारलेली ढलपी किंवा खुंटी ११) नाद; ध्वनी; आवाज १४) उच्च प्रतीचा एक तांदूळ १६) तप्त; तापलेले; रसरशीत २०) अरबी देश २१) जिवंत राहण्यासाठीचा एक आवश्यक घटक; वायू २२) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास; प्रतिष्ठा; वजन २४) पाणथळ किंवा चिखलाची जमीन २५) सावट; छाया

उभे शब्द :- १) भारतीय क्रिकेट संघातील एक निवृत्त खेळाडू जो फटकेबाज फलंदाज होता २) उत्तराधिकारी; हक्कदार; दुष्मन; शत्रू ३) खेळाडू; आनंदी; खेळणारा ४) गाढवी व घोडा यांच्या संकरातून निर्माण झालेला प्राणी ७) इंग्रजांच्या अगोदर हे युरोपीय लोक भारतात येऊन गेले ९) अग्नी १२) एखाद्याच्या वतीने घातलेली भीड १३) झोपताना डोक्याखाली घेतात ती मऊ वस्तू १५) भारताचा राष्ट्रीय पक्ष १७) मौजेखातर लांबवर फिरायला जाणे १८) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ १९) बारा वर्षांचा काळ; खडतार व्रत २३) तसला; त्या प्रकारचा

शब्दगंध क्र. ७५६२ चे उत्तर



***** मुलांचे विश्व *****

सुविचार : गेलेली वेळ परत येत नाही, म्हणून ती जपून वापरा.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

थंडी वाजल्यावर अंगावर काटा का येतो?

थंडीत अंगावर कटा येण्याचे सगळ्यात मोठे आणि मुख्य कारण म्हणजे त्वचा खूप कोरडी होणे, कारण थंडीच्या दिवसांत हवेत ओलावा खूप कमी असतो आणि थंड वारा त्वचेवर सतत आदळत राहतो, त्यामुळे त्वचेतील नैसर्गिक तेल आणि पाणी हळूहळू निघून जाते, त्वचा कोरडी, खरबूड, निस्तेज होते आणि मग तिला सारखा कटा यायला लागतो, त्यात आपण थंडीपासून वाचण्यासाठी खूप गरम पाण्याने अंघोळ करतो, अंगाला जास्त साबण लावतो, गरम पाण्याने वारंवार हातपाय धुतो, त्यामुळे त्वचेवरचा संरक्षक थर निघून जातो आणि त्वचा अजून जास्त कोरडी होते, शिवाय लोकरीचे स्वेटर, शाल, टोपी, मफलर थेट अंगाला लावले तर लोकरीच्या धाग्यांनी त्वचेला घासले जाऊन कटा आणखी वाढतो, हिवाळ्यात आपण पाणीही कमी पितो, त्यामुळे आतूनही शरीर कोरडे पडते.

उन्हात कमी फिरल्याने आणि सतत घरात बसून राहिल्याने त्वचेला हवा लागत नाही आणि रक्ताभिसरणही कमी होते, काही लोकांना थंडीची ॲलर्जी असते, काहींना धुळीची, तर काहींना वापरात असलेल्या साबण, क्रीम, डिटर्जंट किंवा नवीन कपड्यांमुळेही कटा येतो, म्हातारपणात, लहान मुलांमध्ये आणि ज्यांची त्वचा आधीपासूनच कोरडी किंवा संवेदनशील आहे त्यांना हा त्रास जास्त जाणवतो, त्यामुळे उपाय म्हणून अंघोळीला खूप गरम पाणी वापरू नका, नेहमी कोमट पाणी घ्या, अंघोळ पाच ते दहा मिनिटांपेक्षा जास्त लांबवू नका, साबण कमी लावा आणि शक्य असेल तर सौम्य, मॉइश्चरायझर असलेला साबण किंवा बेसन, दूध यांचा वापर करा, अंघोळ झाल्यावर टॉवेलने जोरात घासू नका, हलकेच पुसून त्वचा थोडी ओलसर असतानाच खोबरेल तेल, बदाम तेल, तिळाचे तेल किंवा चांगले मॉइश्चरायझर संपूर्ण अंगाला लावा, सकाळी आणि रात्री झोपताना हातापायांना, तळव्यांना, कोपरांना आणि गुडघ्यांना नीट तेल किंवा क्रीम लावा, दिवसभर थोडे थोडे करून पुरेसे पाणी प्या, कोमट पाणी, सूप, दूध, फळांचा रस घ्या, जास्त तेलकट, तिखट, आंबट, बाहेरचे पदार्थ टाळून हिरवी पालेभाजी, गाजर, बीट, पपई, संत्री, मोसंबी, केळी अशी फळे खा, कारण यातून त्वचेला आवश्यक जीवनसत्त्वे आणि ओलावा मिळतो, लोकरीचे कपडे थेट अंगाला लावू नका, आत नेहमी सुती कपडा घाला, कपडे धुताना जास्त वासाचे डिटर्जंट वापरू नका, खोलीत हिटर जास्त वेळ चालू ठेवू नका, कारण त्याने हवा अजून कोरडी होते, त्वचेवर सारखे नखाने खाजवू नका, कारण खाजवल्याने त्वचा फाटते.

जखम होते आणि तिथे संसर्ग होण्याचा धोका वाढतो, कटा खूप येत असेल तर थंड पाण्याची घडी ठेवणे, कोरफड किंवा काकडीचा गर लावणे काही लोकांना आराम देते, पण प्रत्येकाने आपल्या त्वचेच्या प्रकारानुसारच हे करावे, जर कटा बरोबर लाल चट्टे येणे, फोड येणे, सूज येणे, त्वचा फाटून रक्त येणे, पू येणे, ताप येणे, रात्रभर झोप न लागणे, कटा आठवड्याभरापेक्षा जास्त टिकणे किंवा औषध लावूनही कमी न होणे असे असेल तर घरगुती उपायांवर वेळ न घालवता लवकरात लवकर त्वचारोग तज्ञ डॉक्टरांना दाखवून योग्य तपासणी आणि उपचार करून घ्यावेत, कारण वरवर साधा वाटणारा कटा कधी कधी इसब, सोरायसिस, बुरशीजन्य संसर्ग किंवा आतल्या एखाद्या आजाराचे लक्षण सुद्धा असू शकते.

अहंकाराचा विनाश

एका गावात एक खूप श्रीमंत आणि हुशार तरुण राहत होता. त्याचे नाव होते अर्जुन. त्याच्याकडे मोठे घर होते. गाडी होती. शेती होती. नोकरीतही तो सगळ्यांपेक्षा पुढे होता. त्यामुळे हळूहळू त्याच्या मनात अहंकार शिरला. त्याला वाटू लागले की मीच सगळ्यात हुशार आहे. माझ्याशिवाय या गावात कुणालाच काही येत नाही. मी आहे म्हणूनच सगळे चालते. तो घरात आईवडिलांशीही तुटकपणे बोलू लागला. मित्रांना कमी लेखू लागला. गरीब लोकांना तुच्छ समजू लागला. जो कोणी त्याला सल्ला देईल त्याला तो म्हणायचा तुम्हाला काय कळते. मी सगळे बघितले आहे.

एक दिवस गावात एक मोठा कार्यक्रम ठरला. त्या कार्यक्रमात गावातील सगळ्या लोकांनी अर्जुनला प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले. पण त्याच्या अहंकारामुळे त्याने सगळ्यांचा अपमान केला आणि म्हणाला मी येणार नाही. माझ्याशिवाय तुमचा कार्यक्रम होणारच नाही. पण लोकांनी त्याच्याशिवायच कार्यक्रम खूप छान पार पाडला. त्याच वेळी अर्जुनच्या व्यवसायात मोठे नुकसान झाले. त्याची गाडी बंद पडली. त्याचा मोबाईल हरवला. त्याला मदतीसाठी कुणीच मिळेना. कारण त्याने अहंकारात सगळ्यांना दुरावले होते. तेव्हा तो एका जुन्या विहिरीजवळ जाऊन बसला. तिथे एक म्हातारा आजोबा बसले होते. त्यांनी त्याला विचारले बाळा का नाराज आहेस. अर्जुनने सगळे सांगितले. तेव्हा आजोबांनी त्याला एक मडके दाखवले आणि म्हणाले हे मडके बघ. ते मातीचे आहे. त्याला वाटते की मी खूप मजबूत आहे. पण एका दगडाने ते फुटते. तसेच माणसाचे आहे. माणूस कितीही मोठा झाला तरी तो मातीचाच आहे.

आज आहे उद्या नाही. अहंकार हा माणसाला आतून पोखरतो. तो माणसाला एकटा पाडतो. त्या दिवशी अर्जुनला आपली चूक कळली. तो गावात परत गेला. सगळ्यांची माफी मागितली. आईवडिलांच्या पाया पडला. मित्रांना मदत करू लागला. गरीब लोकांसाठी काम करू लागला. हळूहळू त्याचे नुकसान भरून निघाले. पण त्यापेक्षा मोठे म्हणजे त्याला माणसे परत मिळाली. तेव्हा त्याला कळले की संपत्ती हुशारी आणि पद हे आज आहे उद्या नाही. पण नम्रता आणि प्रेम हे माणसाला कायम मोठे ठेवते. अहंकाराने माणूस उंच दिसतो पण आतून रिकामा होतो. आणि नम्रतेने माणूस लहान दिसतो पण आतून खरा मोठा होतो. म्हणूनच अहंकाराचा शेवट नेहमी विनाशात होतो आणि नम्रतेचा शेवट नेहमी विजयात होतो.

तात्पर्य : अहंकार माणसाला इतरांपासून तोडतो. त्याची माणसे त्याचा मान आणि त्याचे सुख हळूहळू हिरावून घेतो. तर नम्रता माणसाला जोडते. त्याला खरा मोठेपणा देते आणि जीवनात कायम टिकणारा विजय मिळवून देते.

आत्मशक्ति



ह्यापुढे जाऊन म्हणावे की, मला क्रोधीत करणाऱ्या अशा घटना पुढेही घडू शकतील. तर मग मी माझ्या जीवनात असाच क्रोध करीत रहावे का? हे आयुष्य बहुमोल आहे! फालतू रागामध्ये ते वाया घालविण्याची माझी इच्छा नाही.क्रोध संपविण्याची आणखी एक पध्दत आहे. ती म्हणजे ध्यान करणे. हे एक अशा प्रकारचे चक्र आहे जसे की, यशस्वी ध्यानासाठी आम्ही क्रोधावर विजय मिळविला पाहिजे आणि क्रोधावर विजय मिळविण्यासाठी आम्ही ध्यान केले पाहिजे.

अध्यात्मिक शक्ती

हे एक सफलता देणारे चक्र आहे. आम्ही भजन अभ्यासाच्या कोणत्याही पातळीवर असणे तरीही, जेवढा वेळ आम्ही भजन अभ्यासात घालवू तेवढी आम्हाला शांतता मिळते. कोणत्याही परिस्थितीत आम्ही क्रोधीत होत नाही. शारीरीक पातळीवरही क्रोधावर नियंत्रण ठेवण्यात भजन अभ्यास मदत करतो. भजन अभ्यासाचे वेळी हृदयाची धडधड मंद होत जाते व आमच्या अंतरी होणारे विचारही मंद होत जातात. आमचे शरीर आणि मन अधिकाधिक तणावरहीत होत जाते. अशा परिस्थितीत क्रोधाला वाढण्याची संधी कमी होते. आमचा राग शांत होत जातो व भजन अभ्यासात ध्यान अधिक टिकते. ध्यान अभ्यासात आम्ही जेवढा जास्त वेळ देऊ तेवढ्या प्रमाणात आम्हाला शांत व समतोल राहण्याची सवय लागेल.असत्यावर विजयअध्यात्मिक प्रगति साधण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे खोटेपणा नष्ट करणे. आमचे मन आम्हाला खोटेपणाच्या जाळ्यात अडकविते. जर आम्ही खोटे बोललो, धोकेबाजी केली, चोरी केली किंवा खरेपणा झाकला तर आमचे मन सदा खोटेपणाने भरलेले राहते.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : मुलांबरोबर सगळी नाती तोडून टाकण्याची भीती दाखवतात.

शिवानीदीदी : हो, अशा अनेक गोष्टी बोलल्या जातात.आता पुन्हा तुमच्या उदाहरणाकडे येऊ या. जर त्या माणसाने दोन किलोमीटर चालण्याचा तुम चा सल्ला प्रत्यक्षात आणला आणि चक्कर येऊन तो निम्म्या अंतरावर कोसळला. तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या कर्मामध्ये ती व्यक्तीही समाविष्ट असेल जिने तो सल्ला दिला होता. कारण त्या व्यक्तीने फक्त सल्लाच दिला नव्हता तर तसं करण्यासाठी त्याला भाग पाडलं होतं.

सुरेश ओबेरॉय : पण त्या क्षणी तो पडणार आहे असं त्याच्या कार्मिक खात्यामध्ये लिहिलेलंच असणार.

नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : पण ते आलं कुठून ? सल्ला देणारा माध्यम बनला. तेव्हा, अशी कर्म रचण्यासाठी आपण साधन बनणार नाही, अशा कर्मांसाठी आपण कारणीभूत ठरणार नाही असा आपण यातून धडा घेऊ या.

सुरेश ओबेरॉय : कुटुंब प्रमुख असल्याने, मी घरातील दोन लग्नं ठरवली आणि दोन्ही लग्नं अयशस्वी झाली. अनेक वर्षे त्याचा सल माझ्या मनात होता. जेव्हा माझी मुलं मोठी झाली, मी माझा दृष्टिकोन बदलला. जेव्हा लग्नासाठी स्थळ आलं तेव्हा मी, मुलगा आणि मुलगी यांची भेट घालून दिली ज्यामुळे ते एकत्रितपणे हा निर्णय घेऊ शकतील. माझ्या निर्णयावर मी खूप खुश आहे.

शिवानीदीदी : हाच दृष्टिकोन आयुष्यातल्या इतर प्रसंगांत, अगदी छोट्या प्रसंगातही ठेवला पाहिजे. दुसऱ्या व्यक्तीसाठी आपण निर्णय घेता कामा नये. आपण सल्ला अवश्य द्यावा पण निर्णय काय घ्यायचा हे त्यांच्यावर सोडून द्यावं. जेव्हा कोणी आपला सल्ला घ्यायला येतं तेव्हा त्यांना अशा प्रकारे सांगायला हवं - माझ्या मते, हे करणं बरोबर आहे, किंवा मी जर तुझ्या जागी असते, तर मी हे केलं असतं. त्या व्यक्तीला सोयीचं काय आहे त्यानुसार तिने निर्णय घ्यायला हवा, ही गोष्ट तुम्ही अधोरेखित करा. तुम्हाला या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावं लागेल.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो, तुम्ही माझ्यावर कधीच प्रेमाने बोलत नाही.
नवरा : बोलतो ना ग, पण तू ऐकतेच कुठे.
बायको : मग एकदा म्हणा ना, मी सुंदर दिसते. नवरा : तू सुंदर दिसतेस.
बायको : बघा, एवढं म्हणायला काय जातं ? नवरा : काही नाही जात, फक्त माझा खरा पणा जातो.

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील पहिली महिला पंतप्रधान कोणत्या देशाची?
- श्रीलंका देशाच्या सिरिमावो भंडारनायके

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदामध्ये आईच्या चौरस आहाराला प्राधान्य दिले आहे. आईचा आहार आयुर्वेदानुसार सात्त्विक असावा. सत्त्व, रज व तम या तीन गुणांपैकी सत्त्व हा गुण उत्तम आहे; म्हणून शक्यतो शाकाहारी आहाराला प्राधान्य द्यावे. मोड आलेली कडधान्ये याम धून प्रथिने व ओमेगा-३ अशी फॅटी सिड्स मिळतात. जवसातून सुद्धा ओमेगा-३ मिळते. मुगडाळ तसेच सर्व काही डाळींमधून प्रथिने मिळतात. आहारामध्ये यांचा समावेश असावा. हिरव्या पालेभाज्यांमध्ये लोह असते.हिरव्या पालेभाज्या, दूध, शेंगदाणे, गूळ, राजगिरा, काळे मनुके, खजूर, बीट, गाजर हे पदार्थही गर्भवतीच्या आहारात असावे.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

म्हणजे आयुर्वेद व आधुनिकशास्त्रांची सांगड घालून चौरस आहार तयार होतो. एकाच वेळी भरपूर खाण्यापेक्षा दर दोन ते अडीच तासांनी थोडे थोडे काहीतरी खात राहावे. म्हणजे उलटी व मळमळ होणार नाही. गर्भवतीची व बाळाची तब्येत सुदृढ होईल. गर्भवतीने पाण्यामध्ये ज्येष्ठमध पावडर टाकून ते पाणी सतत प्यावे. तसेच या काळात जास्त मळमळ होत असल्यास वेलची, लवंग किंवा आवळा कॅण्डी, आवळा सुपारी तोंडात धरावी. गर्भवतीने अतितिखट पदार्थ टाळावेत.

गाडीवरचे पदार्थ, भेळ, वडापाव, पाणीपुरी, शेवपुरी, पिझ्झा, बर्गर, पावभाजी या पदार्थांचा मोह टाळावा. बाहेरचे पाणी पिऊ नये. दूषित पाण्यामुळे व अन्नामुळे पोटाचे आजार होण्याचा संभव असतो. उदा. गॅस्ट्रोसारखे आजार होतात. तसेच किटकनाशक जास्त वापरलेला भाजीपाला, अन्न किंवा शीतपेयामुळे फॉलिक सिडची कमतरता निर्माण होऊन मेंदूचा विकास व्यवस्थित होत नाही.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

लंगडी संघटनेतर्फे २९ नोव्हेंबर रोजी संघ निवड चाचणी व ज्युनिअर मुले व मुली शहर जिल्हास्तर स्पर्धांचे आयोजन

नगर – अहिल्यानगर शहर व जिल्हा लंगडी संघटना आयोजित शहर व जिल्हास्तर स्पर्धा व जिल्हा संघ निवड चाचणी २९ नोव्हेंबर रोजी शहर व जिल्हास्तर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, सदर स्पर्धांमधून जिल्ह्याचा उत्कृष्ट संघ राज्य स्पर्धांसाठी जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्पर्धांसाठी सन २००८ व त्यापुढील जन्मलेले खेळाडू पात्र असतील, अशी माहिती संघटनेचे उपाध्यक्ष महेश आनंदकर यांनी दिली. तसेच स्पर्धांसाठी अचूक खेळाडूंनी खालील दिलेल्या विभाग प्रमुखांशी संपर्क साधण्याचे आवाहन सचिव प्रशांत पाटोळे यांनी केले आहे.

खेळाडू व्यक्ती अथवा सांघिक स्वरूपात आपली प्रवेशिका निश्चित करू शकतात, सोबत जन्मदिनांक पुरावा (जन्म दाखला/ बोर्ड मार्कशीट/ बोर्ड प्रमाणपत्र/ शाळेचा अथवा महाविद्यालयाचा बोनाफाईड दाखला (वरील पैकी कोणताही एक पुरावा, आधार कार्ड, २ पासपोर्ट फोटो, खेळाडूंनी योग्य क्रीडा गणवेशात (Sports Kit) वेळेवर मैदानात उपस्थित राहावे.

प्रत्येक संघात १२ खेळाडू असतील (०९ खेळाडू मैदानात व ०३ खेळाडू राखीव) तसेच प्रवेश अर्ज संपूर्ण माहिती सोबत जमा करणे आवश्यक आहे. प्रवेश स्वीकारण्याची अंतिम तारीख : २८ नोव्हेंबर राहील, (प्रत्येक गटासाठी)

विजयी संघ : आकर्षक चषक व प्राविण्य प्रमाणपत्र प्रथम १, २, ३ क्रमांक पटकावणाऱ्या संघास तसेच, उत्कृष्ट खेळाडू : भेटवस्तू

सहभागी संघ : सन्मान चिन्ह + सहभाग प्रमाणपत्र, या स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूंमधून लंगडी असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित १८ वर्ष मुले व मुली राज्यस्तरीय लंगडी अजिंक्यपद स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे अधिकृत संघ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील असे आवाहन संघटना सहसचिव अमोल ठोंबे यांनी माहिती दिली.

जिल्ह्यातील उत्कृष्ट संघ निवडण्यासाठी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन संघटना अध्यक्ष प्रदीप पाटोळे यांनी केले. अधिक माहिती व नाव नोंदिणीसाठी संपर्क : श्रीगोंदा विभाग ९७३०० ३७५५५, सावेडी उपनगर ९८५००२३२२६, नगर शहर ८०८७८७०८९९/ ८३९०४ १४१४९, सूपा विभाग ७२७६४ २५५४८, श्रीरामपूर विभाग ७७४५० ३९२५३. अधिक माहिती साठी संपर्क ८२७५१९९७७७१ / ८०८७८७०८९९.

आयडीबीआय बँकेच्या खाजगीकरणाविरोधात नगरमध्ये २६ नोव्हेंबरला कर्मचाऱ्यांचा एल्गार!

विशेष मार्गदर्शन व संवाद सभेचे आयोजन



कॉ. धनंजय कुलकर्णी

कॉ. देवीदास तुळजापूरकर

नगर – सार्वजनिक बँकिंग क्षेत्रासमोर निर्माण झालेली आव्हाने, आयडीबीआय बँकेच्या प्रस्तावित खाजगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि त्याचा बँक कर्मचारी चळवळीवर होणारा प्रभाव या विषयांवर चर्चा करण्यासाठी अहिल्यानगरमध्ये २६ नोव्हेंबरला विशेष मार्गदर्शन व संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बँक कर्मचारी संघटनेच्या वतीने दिल्लीगेट येथील स्पाय हॉटेलमध्ये सायंकाळी ५ वाजता ही सभा होणार आहे.

देशातील सार्वजनिक बँकिंग व्यवस्थेचे भवितव्य, बँकिंग क्षेत्रातील बदलती धोरणे, खासगीकरणाचे संभाव्य परिणाम आणि बँक कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण या विषयांना सध्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर बँकिंग उद्योगातील सद्यस्थितीचा आढावा घेऊन कर्मचारी चळवळीपुढील आव्हाने आणि आगामी संघर्षाची दिशा यावर या सभेत सविस्तर विचारमंथन केले जाणार आहे.

या सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य बँक कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कॉ. धनंजय कुलकर्णी राहणार आहेत. बेट्टाचे अध्यक्ष तसेच आयडीबीआय कर्मचारी संघटनांच्या संयुक्त मंचाचे (युनायटेड फोरम ऑफ आयडीबीआय युनियन्स) निमंत्रक कॉ. देविदास तुळजापूरकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून 'आयडीबीआय बँकेचे खाजगीकरण आणि बँक कर्मचारी चळवळीपुढील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य बँक कर्मचारी महासंघाचे सहसचिव कॉ. शिरीष राणे आणि विभागीय सचिव कॉ. नरेंद्र जंगम यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. बँकिंग क्षेत्रातील संघटनात्मक भूमिका, कर्मचारी हिताचे प्रश्न, सार्वजनिक बँकांचे महत्त्व आणि बदलत्या आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीवर कर्मचारी संघटनांसमोरील आव्हाने याबाबत या सभेत विचार मांडले जाणार आहेत.

मुख्य मार्गदर्शन सभेपूर्वी दुपारी ४ ते ५ या वेळेत बँकांमधील हंगामी कर्मचारी आणि व्यवसाय प्रतिनिधी (बँक मित्र) यांच्यासाठी स्वतंत्र विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात हंगामी कर्मचाऱ्यांच्या समस्या, त्यांचे हक्क, कामाच्या ठिकाणी येणाऱ्या अडचणी तसेच व्यवसाय प्रतिनिधींचे प्रश्न आणि भविष्यातील वाटचाल यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. या विशेष सत्राचा लाभ घेण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

सार्वजनिक बँकिंग व्यवस्थेचे महत्त्व, बँकिंग उद्योगातील बदलते स्वरूप आणि कर्मचारी चळवळीची भविष्यातील भूमिका समजून घेण्यासाठी ही सभा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत, सार्वजनिक तसेच इतर बँकांमधील कार्यरत कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी, हंगामी कर्मचारी आणि व्यवसाय प्रतिनिधी यांनी या सभेला उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा बँक कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष माणिक अडाणे, सरचिटणीस कांतिलाल वर्मा, कॉ. सुजय नळे आणि कॉ. प्रकाश कोटा यांनी केले आहे.



सोसायटी ऑफ मिडवाईफ इंडिया यांच्या वतीने नैसर्गिक प्रसूती पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी देशभरात राष्ट्रव्यापी वॉकथॉन आणि जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृतीसाठी रॅली; विद्यार्थी व प्राध्यापकांचा सहभाग

नगर – मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असतो. या काळात आईचे आरोग्य, बाळाची सुरक्षितता आणि सन्मानपूर्वक मातृत्व काळजी यांना सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. मात्र, अलीकडच्या काळात सिझेरियन प्रसूतींचे वाढते प्रमाण हा आरोग्य क्षेत्रातील चिंतेचा विषय बनला आहे. या पार्श्वभूमीवर नैसर्गिक प्रसूतीबाबत जनजागृती करण्यासाठी आणि सुरक्षित मातृत्वाचा संदेश समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर मध्ये जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत ३४० नर्सिंग विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

सोसायटी ऑफ मिडवाईफ इंडिया यांच्या वतीने नैसर्गिक प्रसूती पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी देशभरात राष्ट्रव्यापी वॉकथॉन आणि जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी २२ नोव्हेंबर रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रॅलीला डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रापासून सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत रॅलीचा समारोप प्रोफेसर चौक येथे करण्यात आला. या रॅलीमध्ये नर्सिंग महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक असे एकूण ३४० जण सहभागी झाले होते. हातात जनजागृतीपर फलक घेऊन आणि घोषणा देत विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये नैसर्गिक प्रसूतीचे महत्त्व पटवून दिले. आरोग्य क्षेत्रातील व्यक्तींसह समाजातील सर्व घटकांनी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

याप्रसंगी स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र संघटनेच्या अहिल्यानगर शाखेच्या सचिव डॉ. नीलम बागल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सामाजिक उपक्रमासाठी संस्थेचे वैद्यकीय संचालक प्रा. डॉ. अभिजित दिवटे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष अमर गुरव यांनी उपस्थिती दर्शवून उपक्रमाला पाठिंबा दिला. संपूर्ण कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रतिभा ए. चांदेकर आणि उपप्राचार्या डॉ. योगिता औताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नीलिमा जगताप, रेबेका साळवे आणि नम्रता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

मित्राच्या आईला रक्तदान करून निभावले मित्रत्वाचे कर्तव्य

विनायकनगर येथील वृत्तपत्र विक्रेते चेतन गुंदेचा यांनी दाखविले माणुसकीचे दर्शन



जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. जी. एस. गुप्ता यांच्या हस्ते चेतन गुंदेचा यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

नगर – नवी पेठ येथील महेश गुगळे यांच्या आईला रक्ताची तातडीची गरज भासल्याचे समजताच नालेगाव येथील जनकल्याण रक्तपेढीत जाऊन वृत्तपत्र विक्रेते चेतन गुंदेचा यांनी सर्व चाचण्यांची तपासणी करून वेळेवर रक्तदान केले त्यामुळे त्यांच्या मित्राच्या आईचा जीव वाचवता आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जनकल्याण रक्तपेढीचे डॉ. जी. एस. गुप्ता म्हणाले की, चेतन गुंदेचा यांच्यासारख्या तरुण रक्तदात्यांमुळेच अनेक रुग्णांना नवजीवन मिळते. प्रत्येक निरोगी व्यक्तीने दर तीन महिन्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करावे. त्यांच्याच हस्ते चेतन गुंदेचा यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

अहिल्यानगर शहरातील विनायकनगर परिसरात वृत्तपत्र विक्रेते चेतन गुंदेचा वास्तव्यास आहेत. ऊन, वारा, पाऊस अथवा थंडीलाही न जुमावता दिवसभरातील सकाळी व संध्याकाळी या दोन सत्रात ते विविध वृत्तपत्राचे वाटप कार्यालय, दुकाने व घरोघरी नित्य नियमाने करत असतात. विशेष म्हणजे वृत्तपत्राचे वाटप ते सायकलद्वारेच करतात.

वृत्तपत्र विक्रेता असूनही सामाजिक कार्यात ते नेहमीच अग्रेसर असतात. रक्तदान, वृक्षारोपण, गरीब विद्यार्थ्यांना मदत अशा अनेक सामाजिक उपक्रमात ते सहभागी होत असतात. त्यांच्या या कार्यात त्यांच्या कुटुंबियांचेही सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी सांगितले.

लग्नाचे अमिष दाखवून फसविल्याप्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

नगर – नगरमधील आरोपी संदेश क्षेत्रे यांच्याविरुद्ध लग्नाचे अमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवून नंतर लग्नास नकार दिला या कारणावरून मुंबई येथील तरुणीने कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. सदर फिर्यादी तरुणी ही मुंबई या ठिकाणची राहणारी असून आलमगिरी भिंगार या ठिकाणी आलेले असताना आरोपीची तिच्याबरोबर ओळख झाली होती. तरुणी व आरोपी हे फोन वरती एकमेकांशी बोलू लागले. सोशल मीडियाद्वारे चॅटिंग करू लागले. पुढे ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. तरुणी आरोपीला भेटण्यासाठी मुंबईवरून नगरला येवू लागली. दोघे एकमेकांना भेटू लागले. मला तू खूप आवडते मला तुझ्याशी लग्न करायचे आहे असे म्हणून आरोपीने तरुणीला लग्नाची मागणी घातली व तिच्याशी जवळीक साधली व तिच्याबरोबर शारीरिक संबंध स्थापित केले व आपण लवकरच लग्न करू असे लग्नाचे आश्वासन, वचन दिले.

परंतु कालांतराने आरोपीने तरुणीस लग्नासाठी नकार दिला व तिच्याबरोबर लग्न केले नाही व तिच्याशी संबंध तोडून टाकले. यामुळे तरुणीने आरोपी विरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्यात कोतवली पोलिसांनी आरोपीस अटक केली. आरोपीने जामीन भेटावा यासाठी ॲड. सचिनदेवा पाठक गुरुजी यांच्यामार्फत जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे खोटे आश्वासन दिले नव्हते.

आरोपीची लग्न करण्याची इच्छा होती परंतु काही कारणास्तव व घरच्यांचा विरोध असल्यामुळे आरोपी तिच्याशी लग्न करू शकला नाही. त्याचप्रमाणे तिच्या इच्छेविरुद्ध कोणतेही गैरकृत्य केले, कोणत्याही प्रकारे शारीरिक संबंध केले नाही. विवाहाचे वचन भंग केले नाही या व अशा अनेक गोष्टी युक्तीवादामध्ये न्यायालयासमोर प्रकर्षाने दाखवून व पुराव्यासह सिद्ध केले. त्यामुळे न्यायालयाने आरोपीला अटी व शर्थींवर जामीन मंजूर केला.



देहरे शिंगवे येथील मनगाव प्रकल्पाला बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपचे सदस्यांनी भेट दिली. यावेळी डॉ. राजेंद्र व सुचेता धामणे.

ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांची मनगाव प्रकल्पाला मदत

नगर – मनमाड रोडवरील देहरे शिंगवे येथील मनगाव प्रकल्पाला बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपच्या सदस्यांनी किराणा साहित्य भेट दिले. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख डॉ. राजेंद्र व डॉ. सुचेता धामणे उपस्थित होते. बालिकाश्रम रोडवर दररोज मॉर्निंग वॉक करण्यासाठी येणाऱ्या ग्रुपच्या सदस्यांनी एकत्र येऊन वर्गणी केली आणि यातून या प्रकल्पाला किराणा साहित्य दिले.

यावेळी ग्रुपचे अध्यक्ष ॲड. अशोक गायकवाड, ॲड. बबनराव सुंबे, मधुकर साबळे, गोविंद खेर्डेकर, अशोक भूतकर, रमेश बोरुडे, सुदाम देशमुख, नवनाथ कुऱ्हे हे सहकुटुंब उपस्थित होते.

मनगाव प्रकल्पात पाचशे मनोरुग्ण महिलांचा सांभाळ केला जात आहे. प्रकल्पातील स्वच्छता, व्यवस्था आणि सोयी, सुविधा उत्तम आहेत. मात्र मनोरुग्णांना दररोज औषधे आणि भोजनाचा दैनंदिन खर्च मोठा आहे. त्यासाठी दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन मदत करावी असे आवाहन ग्रुपचे अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी केले. प्रकल्पामध्ये सुरू करण्यात आलेले गाय गोठाचे काम कौतुकास्पद असल्याचे गायकवाड म्हणाले. यावेळी सदस्यांनी प्रकल्पातील सर्व उपक्रमांची पाहणी केली.

अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे दिव्यांग खेळाडूंसाठी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ

अंध विद्यार्थ्यांना गोलबॉलचे तर, मूकबधिर विद्यार्थ्यांना तिरंदाजीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण



अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात दिव्यांग खेळाडूंसाठी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ झाला असून अंध विद्यार्थ्यांना गोलबॉलचे तर, मूकबधिर विद्यार्थ्यांना तिरंदाजीचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

नगर – अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे अनामप्रेम, आयशा (AIASHA) मुंबई व पॅरा ब्लाइंड स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना वाव देण्यासाठी दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आंतरराष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक खेळ असलेल्या गोलबॉलचे प्रशिक्षण अंध विद्यार्थ्यांसाठी व आर्चरीचे (तिरंदाजी) प्रशिक्षण मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी तर देण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या प्रशिक्षणासाठी मेक्सिको आणि मुंबई येथील आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व अनुभवी प्रशिक्षक उपस्थित आहेत.

अंध विद्यार्थ्यांना गोलबॉल या खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी मेक्सिको येथील आंतरराष्ट्रीय गोलबॉल खेळाडू व प्रशिक्षक गियेरमो सान्चेझ तसेच मुंबई येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक नेहा नलिन पावसकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यांच्या जोडीला अलेक्सिस पेराल्टा आणि सायझा नायर या सहप्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन करत आहेत. मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी आर्चरीचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रसिध्द प्रशिक्षक गणेश मिसाळ उपस्थित आहेत. नेहा पावसकर यांना राष्ट्रपती, शिवछत्रपती, संविधान योद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव

कार्यक्रमाची सुरुवात लुईस ब्रेल, हेलन केलर आणि बाबा व साधना आमटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून तसेच राष्ट्रगीताने करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष अजित माने यांनी प्रास्ताविक केले, संस्थेचे संचालक अभय रायकवाड यांनी परिचय करून दिला. यावेळी रेसिडेन्शियल ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक कांजवणे एम. एस., प्राध्यापक डॉ. म्हातारदेव म्हस्के सर तसेच जवाहर मिठूलाल गुगळे यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. दिव्यांग विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुण ओळखून त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळ

या प्रशिक्षण शिबिरामुळे अंध विद्यार्थ्यांना गोलबॉलसारख्या आंतरराष्ट्रीय खेळाची ओळख व प्रत्यक्ष प्रशिक्षण मिळत असून मूकबधिर विद्यार्थ्यांना तिरंदाजी या कौशल्यपूर्ण खेळाचा अनुभव घेता येत आहे. मेक्सिको आणि मुंबई येथील अनुभवी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळणे ही त्यांच्यासाठी अत्यंत मोलाची संधी ठरली. दिव्यांगत्व हे यशाच्या मार्गातील अडथळा नसून योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी आपले स्वप्न साकार करू शकतो, हा प्रेरणादायी संदेश या प्रशिक्षण शिबिरातून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आणि त्यांच्या क्रीडा भवितव्याला नवी दिशा देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे.

प्रशिक्षणासाठी राबत आहेत अनेक हात

हे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी विष्णू वारकरी, रामदास काकडे, प्रवीण नवले, सुनील कांबळे, सुरेखा राठोड, सुरेखा कोतकर, राहुल खिरोडे, आनंद माळवे, अमृत भुसारी, प्रकाश गजे, अक्षय राऊत, सचिन गारदे, पोपट लोंढे, शिवानंद राऊत यांनी परिश्रम घेतले.

या प्रशिक्षणासाठी डॉ. गिरीश कुलकर्णी, डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. मेघना मराठे, अनिल गावडे, डॉ. रवींद्र सोमाणी, सीए अशोक पितळे, सौ राधा कुलकर्णी, डॉ. सायली सोमण, नितीन थाडे, डॉ. धनंजय वाघ, जे आर मंत्री, अविनाश बोपर्डीकर, ॲड. शाम असावा यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

सुरेश मुनोत स्मरणार्थ नगरमध्ये २९ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबीर

जय आनंद महावीर युवक मंडळ व स्व.सुरेश मुनोत फौंडेशनचे आयोजन

नगर – नगरमध्ये २९ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जय आनंद महावीर युवक मंडळ व सुरेश मुनोत फौंडेशनतर्फे मर्चंटस बँकेचे माजी चेअरमन स्व.सुरेश मोतीलाल मुनोत यांच्या १६ व्या स्मृतीदिनानिमित्त गत १५ वर्षांपासून रक्तदान शिबीर घेण्यात येते. यंदाच्या वर्षी रविवारी नवीपेठेतील बाई ईचरजबाई फिरोदिया प्रशालेत सकाळी ९ ते दुपारी ३ यावेळेत शिबीर होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी दिली.

स्व.सुरेश मुनोत यांनी आपल्या जीवनात कायम समाज सेवेची शिक्षण दिली. साधूसंतांच्या विचारांचा मोठा पगडा असल्याने त्यांनी मानवता धर्माला महत्त्व दिले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. कारण आजच्या विज्ञान युगात कृत्रिम रक्त निर्मिती करणे अशक्य आहे. अशावेळी एखाद्याने केलेले रक्तदान अत्यवस्थ रुग्णासाठी जीवनदान देणारे असते. याशिवाय रक्त घटकही अनेक रुग्णांना आवश्यक असतात. थॅलेसेमिया सारख्या आजारात रुग्णांना रक्ताची मोठी गरज असते. अशावेळी प्रत्येक निरोगी व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे. या शिबिराच्या माध्यमातून रक्तदान चळवळ व्यापक करण्यात येत आहे.

दरवर्षी या शिबिरात मंडळाचे सदस्य तसेच अनेक दाते उत्स्फुर्तपणे रक्तदान करतात. महिलाही रक्तदान करीत असतात. मंडळाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्षे असल्याने सर्व सदस्यांचा उत्साह वाढला आहे. यावेळी रक्तदात्यांनी रक्तदान करून शिबिराला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, कार्याध्यक्ष सत्येन मुथा व मुनोत परिवाराने केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

जैनियांच्या इतिहासातील सुवर्णाक्षरातला यंदाचा अभूतपूर्व 'समर्पण चातुर्मास २०२६'

मी एक जैन. जैनियांचा 'मारवाड' असणाऱ्या आपल्या नगरीत गेल्या ४-५ दशकांपासून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या आनंदधाम परिसराशी, विविध वर्षातल्या चातुर्मास आणि विविध कार्यक्रमांशी जोडला गेलेलो, किमान काहीसा साक्षी बनलेलो आहे.

आठवतयं ते बालपण. तेव्हा पितळे कुटुंबाने दिलेल्या जागेवर एकमेव व पहिलेच धर्मस्थानक होते, आजही आहे तेव्हा १२-१४ वर्षाच्या वयात तत्कालीन पू. श्री मगनमुनीजी म.सा. यांचे वात्सव्य होते. मधुकंठी पू. हसमुखमुनीजी म.सा. जे नंतर अंकाईत स्थायिक झाले. त्यांची सकाळची समुधूर प्रार्थना मनाला प्रसन्न करायची. रतनभुवन मध्ये वास्तव्य असल्याने या थोर विभूतीचं साक्षात दर्शन व्हायचे.

नंतर आपले श्रद्धास्थान, राष्ट्रसंत आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. यांचे त्यांच्या सर्व शिष्यांसह तेथील वास्तव्य पाहिले, अनुभवले. धार्मिक परिक्षा बोर्ड येथे मोठे स्थानक झाले. हळूहळू शहर व जैन समाजही वाढला. विकसित झाला. साहजिकच पुढे सर्व चातुर्मास तेथेच व्हायला लागले. गुरुदेवांच्या सान्निध्याने गर्दी व दर्दी वृद्धींगत होत गेली. भव्य लायब्ररी (जी अजूनही आहे) प्रिंटींग प्रेस व स्वाध्याय परीक्षा व्हायच्या. विविध उपक्रम श्रद्धेने चालायचे.

गुरुदेवांच्या देवलोक गमनानंतर त्यांचे अंत्यदर्शन व अंत्यसंस्कार झालेली अक्षरशः लाखोंची गर्दी पुन्हा कधी पहिलेली नाही. त्यानंतर गुरुदेवांचे बरेच विचारक पू. आदर्शऋषीजी यांनी आनंदधाम साकारण्यास कंबर कसली. आजच्या वैभवशाली आनंदधाम परिसराच्या विकासाचे श्रेय त्यांना जाते. अर्थात गुरुदेवांच्या व इतरही साधुसंतांचे जैनीयांच्या प्रगतीत आपापल्या परीचे व पद्धतीचे योगदान होते व आहे. यात वादच नाही. श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल, इतर सामाजिक, आरोग्य उपक्रमांनी शहरवासियांच्या मनात प्रभावी ठसा उमटला आहे यात शंका नाही.

ही वाटचाल पाहत असताना एक प्रश्न कायम पडायचा. १% जैन समाज! त्यांच्यात पंथ, गट-तट-वाद.! हिंदुंची गीता, ख्रिश्चनांचे बायबल, मुस्लिमांचे कुराण, जैनीयांचे काय? प्रविणऋषीजींनी अभ्यासपूर्वक उत्तराध्ययन सूत्र अर्थात जिनेश्र हे मराठीतून पुस्तक व ॲपद्वारे ज्ञानप्रकार सुरू केल आहे. हे भविष्यात मैलाचा दगड ठरेल. हा बहुतेक सुजाण जैनीयांनाही पडत असेल. सर्वसामान्य जैनांना धर्माबद्दल बऱ्याचशा रितीरिवाज, कर्मकांडची, धर्मज्ञानाची माहिती आहे का?

अशा वातावरणात जवळपास भारत भ्रमण करुन आपल्या ज्ञानोपासनेने, येणाऱ्या पिढीला जैन म्हणून घडवण्यासाठी पुढे आले उपाध्याय प्रवर पू. प्रविणऋषीजी म.सा. मी प्रत्यक्षपणे साधारणतः पुणे, छत्रपती संभाजीनगर चातुर्मासापासून त्यांना ऑनलाईन पाहत, ऐकत येतोय. तसं तर प्रत्येक साधुसाध्वी धर्म प्रचार प्रसार करण्याचाच प्रयत्न करतात. पण त्यात नेमकेपणा, नव्या पिढीसह सर्वांना नेमकं पाहिजे ते देणारे साधुच समाजप्रिय होतात. खरा साधु धर्मज्ञानाचा प्रसार करतो.

आपल्या श्रावक श्राविकांना इतर विविध धर्म, मान्यता, देवदेवतांसह आपल्या जैन परंपरा विषयी सखोल माहिती नाही. त्यासाठी पू. प्रविणऋषीजी अथक अभ्यास, नियोजन, प्रयत्न करताहेत हे सर्वात महत्त्वाचे वाटते. त्यांनी प्रयत्नपूर्वक चालू केलेले उपक्रम युवा, महिला यांच्यासह सर्वच समाजाला उद्बोधक वाटतात. प्रत्येक वर्षी वाढत चाललेले प्रयोग, वाढत असणारी तप, उपवास व आराधना खऱ्या अर्थाने जैनिजम सांगत आहे. भविष्यातही आशा वाढवणारे चेतनादायी कार्यक्रम म्हणजे नवकार कलश, गौतमनिधी, श्री उत्तराध्ययन श्रुतदेव, युगलधर्म, अर्हम धारण, गर्भसंस्कार, धर्मबोधी संस्कार, धर्म जागरण, साप्ताहिक प्रार्थना इ.इ.

एकाच वाक्यात सांगायचे तर मरगळलेल्या श्रावकांना त्यांनी पुन्हा धर्माकडे वळवले आहे. म्हणूनच हा यावर्षीचा नगरचा समर्पण चातुर्मास विलक्षण लक्षयीय आहे. त्यासाठी सर्वांचेच अभिनंदन!

चातुर्मास समिती अध्यक्ष बाबूशेठ बोरा, त्यांचे सर्व सहकारी, दानशूर, समाजभूषण अनेक महानुभव विशेषतः सौरभ बोरा व मित्र मंडळ, सहभागी सर्व श्रावक, श्राविकांना अनेक अनेक धन्यवाद. या सर्वांना एकत्र आणणारे पू. उपाध्यायजी आपल्या गुरुदेवांचे धर्मप्रचाराचे स्वप्न पूर्ण करतील यात शंकाच नाही.

आता सर्वात महत्त्वाचे म्हणजे यावर्षीच्या सर्व चातुर्मास समिती पदाधिकारी व इतर प्रमुख, आनंदधामशी निगडीत श्रावक श्राविका मनाने एकत्र येतील का?

धर्मप्रचार व समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी झटणाऱ्या, प्रामाणिक इच्छा व तन-मन-धनाने तयारी असणाऱ्या विविध गटातील, क्षेत्रातील व्यक्तींनी संघात सहभाग घेतल्यास (त्यांना सामावून घेण्याचा निर्णय झाल्यास) आणि त्यात तरुण पिढीला आशा व विश्वासाचा प्रशस्त मार्ग तयार होईल.

खरं तर समाजाच्या नेतृत्व करणाऱ्या संस्थांत मनापासून काम करणारे, सामाजिक हिताची दृष्टी असणारे महानुभव असणे गरजेचे असते. अशा व्यक्ती व संस्थांनी निःस्वार्थ कार्य केले तर नगरचा जैन समाज सर्वदूर प्रशंसनीय व लक्षधीय ठरतील. हे सर्व कामना केवळ समाजहिताच्या दृष्टीकोनातून आहेत. काही महानुभवांना हे रुचणार नाही पण खरे धार्मिक, श्रावक आत्मपरीक्षण करतील असे वाटते.

राग, द्वेष, समाजासाठी अहंम (स्वार्थ) बाजूला ठेवतील का? मंगलकामना ठेवणं एवढच आपल्या हाती! असे झाले तर हा चातुर्मास भविष्याच्याही सुवर्ण क्षणांचा साक्षी होईल. पटतयं का?

– दिशान फिचर्स



पाईपलाईन रोडवरील नंदनवननगर येथे विठ्ठल-रुक्मिणी व रामेश्वर महादेव मंदिरात मंदिर परिसरात आयोजित अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भक्तिमय वातावरणात सुरवात झाली. (छायाचित्र : लहू दळवी)

नंदनवननगर येथील हरिनाम सप्ताहाची २६ नोव्हेंबर रोजी इंदोरीकर महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार सांगता

नगर - पाईपलाईन रोडवरील नंदनवननगर येथे विठ्ठल-रुक्मिणी व रामेश्वर महादेव मंदिरात मंदिर परिसरात आयोजित अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास भक्तिमय वातावरणात सुरवात झाली. सद्गुरु स्व.ह.भप भाऊ महाराज पाटील यांच्या कृपाशीर्वादाने व ह.भप पुंडलिकशास्त्री जंगले महाराज व ह.भप निवृत्ती इंदोरीकर महाराजांच्या मार्गदर्शनाखाली या अध्यात्मिक सप्ताहाचे करण्यात येत आहे. या सप्ताहाची सांगता २६ नोव्हेंबर रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत समाज प्रबोधनकार ह.भप निवृत्ती इंदोरीकर महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने होणार आहे. यावेळी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

नंदनवननगर परिसरातील नागरिकांच्या वतीने ह.भप संदीप खोसे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचे आयोजन केले आहे. यावेळी परिसराचे नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर व माजी नगरसेवक शिवाजी चव्हाण, मीना चव्हाण व रूपाली बारस्कर यांच्यासह उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.

प्रास्ताविकात संदीप खोसे महाराज म्हणाले, संत संगती, ग्रंथ वाचन व ईश्वर सेवा यामुळे मनुष्याचे अंतःकरण पवित्र होते. उत्तम प्रकारे संसार करून परमार्थात मानव मात्राची प्रिती वाढावी व वारकरी संप्रदायाचे सात्विक विचार रुजून त्यांचा प्रचार व्हावा यासाठी आशा अखंड हरीनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. प्रत्येक मनुष्यात काहीना काही दोष असतातच. सदोष मनुष्या मधील सर्व दोष निघावेत व तो सामान्य व्हावा यासाठी भाविकांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

यावेळी संपत बारस्कर व शिवाजी चव्हाण यांनी शुभेच्छा दिल्या. या हरीनाम सप्ताहात आळंदीचे अशोकशास्त्री इलग महाराज, आखेगावचे वारकरी भूषण श्रीराम झिंजुर्के महाराज, पंढरपूरचे अद्वैत वेदांत भास्कर मारुती तुणतुणे महाराज व ऋषिकेश खोसे महाराज आदींचे प्रवचन व किर्तन होणार आहे.

संविधान जागर महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी माऊली सेवा प्रतिष्ठानचे डॉ. राजेंद्र धामणे यांची निवड

नगर - मानवाधिकार अभियान व सीएसआरडी समाजकार्य व संशोधन संस्था, सहायक आयुक्त कार्यालय समाजकल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्ह्यातील समविचारी संस्था, संघटना, महाविद्यालये व सामाजिक कार्यकर्ते यांच्या पुढाकारातून अहिल्यानगरमध्ये २६ नोव्हेंबर संविधान दिनानिमित्ताने संविधान जागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यादृष्टीकोनातून संविधान जागर महोत्सव समन्वय समितीची बैठक पार पडली. सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या माऊली सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक व डॉ. राजेंद्र धामणे यांची संविधान जागर महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस मानवाधिकार अभियानाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. संतोष गायकवाड, संध्या मेढे, अशोक सब्बन, डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. प्रदीप जारे, सॅम्यूएल वाघमारे, भैरवनाथ वाकळे आदी सदस्य उपस्थित होते.

डॉ. राजेंद्र धामणे हे गेल्या तीन दशकांपासून लोकशाही व संविधानिक मूल्यांच्या संवर्धनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. निराधार, बेघर आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जाणाऱ्या, घर आणि मन हरवललेल्या महिला व मुलांना कायमस्वरूपी निवारा, उपचार आणि पुनर्वसनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी माऊली सेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून मनगाव या स्वयंपूर्ण गावाची निर्मिती केली आहे. सामाजिक कार्यासोबतच ते लेखक, नाटककार आणि दिग्दर्शक म्हणूनही परिचित आहेत. त्यांची कादंबरी व दीर्घकथा संग्रह प्रकाशित झाले असून त्यांनी अनेक लघुपट व माहितीपटांचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. त्यांच्या काही कलाकृतींची आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांसाठी निवड झाली आहे. विविध वर्तमानपत्रांतून सामाजिक विषयांवर त्यांनी स्तंभलेखन केले असून, त्यांनी लिहिलेली चार नाटके राज्य नाट्य स्पर्धेत सादर झाली आहेत. त्यापैकी एका नाटकाची अंतिम फेरीसाठी निवड झाली होती. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतून संविधानातील मूल्ये समाजाच्या तळागाळापर्यंत रुजविण्याचे त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

२६ नोव्हेंबर रोजी महोत्सवाचे आयोजन



संविधान जागर महोत्सवाविषयी अधिक माहिती देतांना ॲड. संतोष गायकवाड यांनी सांगितले कि, मानवाधिकार अभियानाच्या माध्यम ातून दरवर्षी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात येतो. संविधान जागर महोत्सवाचे यंदाचे ०९ वे वर्ष आहे. याहि वर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन मोठ्या उत्सवाच्या स्वरुपात साजरा करण्याचा मानवाधिकार अभियान तसेच अहिल्यानगर सोशल फोरमच्या सर्व पुरोगामी संस्था संघटना यांचा मानस आहे.

संविधान जागर महोत्सवाअंतर्गत यावर्षी संविधान रॅलीच्या सोबतच २६ नोव्हेंबर संविधान दिन ते १० डिसेंबर मानवाधिकार दिन या दरम्यान संविधान जागर पंधरवडा साजरा करण्यात येणार असून संविधानाचा अधिकाधिक प्रचार व्हावा म्हणून संविधान जागर रथ, पथनाट्य, संविधान गीते, प्रबोधनपर व्याख्याने, चर्चासत्रे, शासकीय योजनांची प्रचार प्रसिद्धी या स्वरुपात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सहायक आयुक्त कार्यालय समाजकल्याण विभागाचे प्रवीण कोरगंटीवार यांनी दिली.

समन्वय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार याविषयी अधिक माहिती देतांना डॉ. सुरेश पठारे म्हणाले कि २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० ते १२.३० दरम्यान संविधान जागर महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या अंतर्गत शहरातून संविधान जागर रॅली काढण्यात येणार आहे. रॅलीचा मार्ग महापुरुषांना अभिवादन करत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, महात्मा फुले यांचा पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, सीएसआरडी महाविद्यालय असा असणार असून सीएसआरडी महाविद्यालय येथे संविधान जागर सभेने रॅलीचा समारोप होणार आहे. संविधान जागर सभेत संविधान अभ्यासक प्रा. सुभाष वारे यांचे व्याख्यान होणार आहे. या संविधान जागर रॅलीस जास्तीत जास्त संस्था, संघटना, महाविद्यालयाचे विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते यांनी सहभागी होऊन खारीचा वाटा उचलावा व भारतीय संविधान संवर्धनासाठी योगदान द्यावे असे आवाहन यावेळी डॉ. सुरेश पठारे यांनी केले आहे.

महोत्सवाअंतर्गत कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ॲड. संतोष गायकवाड ९०२८५१००२४, संध्याताई मेढे ७७०९९८५५५५, सॅम्यूएल वाघमारे ८७८८४१२७८०, भैरवनाथ वाकळे ९४०५४०१८०० यांच्याशी संपर्क साधावा.

कल्याण रोडवरील शिंदे मळा येथे 'गौरी गणपती आर्ट' उद्घाटन

कारखान्यांच्या माध्यमातून तरुणांना वर्षभर रोजगाराची संधी : ॲड. युवराज शिंदे

नगर - शहरातील कल्याण रोड परिसरातील शिंदे मळा येथे महालक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या गौरी गणपती आर्ट कारखान्याचे उद्घाटन राजेंद्र शिंदे यांच्या हस्ते झाले.



शहरातील कल्याण रोड परिसरातील शिंदे मळा येथे महालक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या गौरी गणपती आर्ट कारखान्याचे उद्घाटन ॲड. युवराज शिंदे यांच्या हस्ते झाले. (छायाचित्र : लहू दळवी)

याप्रसंगी ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरात मोठ्या प्रमाणात गणपती मूर्ती तयार करण्याचे कारखाने आहेत. या कारखान्यांच्या माध्यमातून अनेक युवकांना वर्षभर रोजगार उपलब्ध होत आहे. गणपती मूर्ती निर्मितीच्या क्षेत्रात अहिल्यानगर शहर राज्यात अव्वल स्थानावर असून, गणेशोत्सवाच्या काळात राज्यातील विविध जिल्ह्यांतून येथे मोठ्या प्रमाणात गणपती मूर्तींची खरेदी केली जाते. विविध रूपांतील आणि आकर्षक स्वरूपातील गणपती मूर्ती तयार करण्याचे कौशल्य येथील कलाकारांकडे आहे. युवकांच्या कलागुणांना आणि त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने महालक्ष्मी उद्योग समूहाच्या माध्यमातून गौरी गणपती आर्ट कारखाना सुरू करण्यात आला आहे. अशा उपक्रमांमुळे स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल, असे शिंदे यांनी सांगितले.

या उद्घाटनप्रसंगी शिवाजी शिंदे, ॲड. युवराज शिंदे, देवा होले, शरद शिंदे, हरीश शिंदे, अनिकेत शिंदे, परितोष शिंदे, विराज शिंदे, राजवीर शिंदे, यशराज शिंदे, तुषार कपाले, किरण सुपेकर, ॲड. श्रीकांत डुबे पाटील, शंतनू डुबे, शेळके सर, सतीश लगड, विजय विश्वकर्मा, विवेक खौसे, अरुण ढाकणे, सूरज नवले, राजेंद्र पाडळे, रोहन पवार आदी उपस्थित होते.



संदीप ठोंबे यांच्यासह कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

नगर - वंचित बहुजन आघाडीचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्य कार्यकारणी सदस्य तथा जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अहिल्यानगर येथील व्ही.आय.पी. सर्किट हाऊस शासकीय विश्रामगृह येथे संदीप ठोंबे व त्यांचे कार्यकर्ते यांचा जाहीर पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या प्रसंगी संदीप जिजाबा ठोंबे, डॉ. भालचंद्र साळवे, योगेश शिंगाडे, सागर देठे, दत्ता सोनटक्के, वैभव सावंत, आशिष खरात, ईश्वर पाटीदार, दिनेश देवळ, ऋषी पवार, प्रकाश शिंदे, विठ्ठल जाधव, गौरव काळे, कार्तिक शिंदे, कुंदन जबरे, सूरज पवार, संदेश केदारे, अनिल विधाते, ऋतुराज अडागळे, अशोक पठारे, अण्णाभाऊ भिंगारदिवे आणि कल्याण सिताराम घोडके यांनी प्रवेश केला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षाचे निळे पंचे घालून स्वागत करण्यात आले.

यावेळी जिल्हा प्रभारी ज्ञानेश्वर कवठेकर, दक्षिण जिल्हाध्यक्ष योगेश साठे, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव आणि शेवगाव तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख यांनी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

राज्यस्तरीय साहित्य संमेलनात शीतल भोईटे यांची कविता सादर



नगर - श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित सहाव्या राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलनात जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील ढासला येथील सोनामता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका तथा कवयित्री शीतल रामकृष्ण भोईटे यांनी निमंत्रित कवयित्री म्हणून सहभाग नोंदवला. त्यांचे माहेर अहिल्यानगर येथे आहे.

सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल, यशवंतराव चव्हाण सेंटर आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या संमेलनात भोईटे यांनी सादर केलेल्या राधेच्या काळजातला कृष्ण या कवितेला रसिकांची दाद मिळाली. आपल्या भावपूर्ण आणि आशयपूर्ण काव्यसादरीकरणातून त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या नामवंत साहित्यिक, कवी यांच्याशी संवाद साधण्याची संधी त्यांना मिळाली. या प्रतिष्ठित साहित्यिक व्यासपीठावरील सहभागामुळे त्यांच्या साहित्यप्रवासाला नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली आहे.

अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहाराची सांगड घालत आनंदी जीवन जगावे

दर्शन व समस्या मार्गदर्शन सोहळ्याला भाविकांची उपस्थिती, २७८ साधकांनी घेतली दीक्षा

नगर - जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या दोन दिवसीय दर्शन व समस्या मार्गदर्शन सोहळ्याची सांगता भक्तिमय आणि आध्यात्मिक वातावरणात झाली. या सोहळ्याला हजारो भाविकांनी उपस्थित राहून जगद्गुरूंचे दर्शन घेत. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. यावेळी २७८ भाविकांनी साधक म्हणून दीक्षा घेतली, तर २६० भाविकांनी उपासक व बालउपासक म्हणून दीक्षा स्वीकारली.

जगद्गुरू रामानंदाचार्य श्रीमद् नरेंद्राचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम संस्थान (उपपीठ उत्तर महाराष्ट्र, नाशिक) यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्यादरम्यान नरेंद्राचार्यजी यांनी आपल्या प्रवचनातून अध्यात्म, विज्ञान आणि व्यवहार यांची प्रभावी सांगड घालत आनंदी जीवन जगावे महत्वपूर्ण संदेश दिला. आजचा माणूस आणि युवक विविध समस्या, ताणतणाव आणि आव्हानांनी ग्रासलेला आहे. अशा परिस्थितीत आध्यात्मिक विचारांची कास धरून सकारात्मक दृष्टिकोनातून जीवनाकडे पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी विविध आध्यात्मिक दाखले देत स्पष्ट केले.भक्ती म्हणजे काय भक्ती का करावी आणि दैनंदिन जीवनात भक्तीचे महत्त्व काय आत्मविश्वास आणि जीवनातील समस्यांना अध्यात्माच्या माध्यमातून सामोरे जाण्याची शक्ती कशी मिळू शकते याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.



नरेंद्र महाराज

संस्थानच्या मरणोत्तर देहदान उपक्रमांतर्गत देहदानाचा संकल्प केलेल्या परिवारांचा सन्मान करण्यात आला. जगद्गुरू नरेंद्राचार्य यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. मरणोत्तर देहदानाच्या माध्यमातून समाजहित आणि वैद्यकीय क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या परिवारांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले. दोन दिवस चाललेल्या या आध्यात्मिक सोहळ्यात भाविकांनी दर्शन, समस्या मार्गदर्शन आणि प्रवचनांचा लाभ घेतला. भक्ती, अध्यात्म, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवेचा संदेश देणारा हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

बालकांच्या वैदिक मंत्रघोषात श्री सत्य साईबाबांचा १०१ वा जन्मोत्सव साजरा

नगर - दीन-दुःखीयों से प्रेम करो, मेरा साई प्रसन्न होगा या साईभजनातील मानवसेवेच्या संदेशाला अनुसरून श्री सत्य साई सेवा संघटनेच्या वतीने भगवान श्री सत्य साईबाबांचा १०१ वा जन्मोत्सव स्नेहालय संस्थेत साजरा करण्यात आला. वैदिक मंत्रांचा घोष, सुमधुर भजने, स्तोत्रपठण आणि विविध धार्मिक उपक्रमांनी हा सोहळा विशेष ठरला. वंचित, निराधार बालके आणि महिलांच्या पुनर्वसनासाठी जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवलेल्या स्नेहालय संस्थेतील बालकांच्या सहभागामुळे या जन्मोत्सवाला मानवसेवेची अनोखी जोड मिळाली.

श्री मार्कंडेय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, श्रमिकनगर येथील विद्यार्थ्यांनी वेदसार पठण आणि महिषासुर स्तोत्र पठण करून सोहळ्याची सुरुवात केली. स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सुमधुर भजनांनी परिसरात आध्यात्मिक स्पंदने निर्माण केली. विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढून जन्मोत्सवाचा आनंद व्यक्त केला. यावेळी सत्य साई १०१ वा जन्मोत्सव आणि हॅपी बर्थडे टू यू साईराम असे संदेश असलेले फुगे आकाशात सोडण्यात आले. फुलांनी सजविलेल्या पाळण्यात शुभ्र वस्त्रांनी सजविलेल्या भगवान बाबांच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली. यावेळी झुला गीत सादर करून केक कापण्यात आला. विविध भाषांमधील साईभजनांनी उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले.



या कार्यक्रमात स्नेहालय संस्थेचे संचालक हनीफ शेख, स्नेहालय इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या शीतल गुंदेचा, संगीत शिक्षक रफिक पठाण, श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुलभा सुरकुटला आणि अध्यापिका वैशाली वरुडे, निवृत मुख्याधपिका अनिता सिद्दम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. जिल्हाप्रमुख अशोक कुरापाटी यांनी भगवान श्री सत्य साईबाबांच्या अलौकिक मानवकल्याणाच्या कार्याची तसेच बालकांवरील त्यांच्या निस्सीम प्रेमाची माहिती दिली. भगवान बाबांच्या आरतीने या जन्मोत्सवाची सांगता झाली.

दरम्यान, दिल्ली गेट येथील साईभक्त कै. बाळकृष्ण दुसा अण्णा यांनी स्थापित केलेल्या साई निलयम भजन सेंटरमध्येही साईभक्तांच्या वतीने जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी नरसिंग दुसा आणि शोभा दुसा यांनी उपस्थित साईभक्तांचे स्वागत केले. स्नेहालयातील बालकांचा सहभाग आणि साईभक्तांची सेवा यामुळे भगवान श्री सत्य साईबाबांचा जन्मोत्सव भक्ती, संस्कार आणि मानवसेवेचा सुंदर संगम ठरला.

कॅलिडोस्कोप



रशियातून थेट बिहारच्या झोपडीत!

बिहारच्या भागलपूर येथे राहणारा राहुल यादव याचे रशियात कामादरम्यान एका रशियन मुलीसोबत प्रेम जडले. राहुल भारतात परतल्यानंतर सहा महिन्यानंतर रशियन तरुणी परिवारासह बिहारमध्ये पोहचली. खऱ्या प्रेमापुढे व्यक्ती देश, भाषा, जात-पात, राहणीमान हे सर्व गोष्टी विसरतो. अशीच काही प्रेम कहाणी बिहारच्या राहुल यादव आणि रशियाच्या जुली या दोघांची आहे. राहुल कामासाठी रशियाला गेला होता, तिथेच त्याची भेट जुली सोबत झाली. हळूहळू दोघांचे एकमेकांवर प्रेम जडले. आता जुली आपल्या परिवाराला घेऊन बिहारमध्ये पोहचली. जुलीला पुढील आयुष्यात राहुलची साथ हवी आहे.

राहुल आणि जुली यांचे प्रेम पैसा, संपत्तीच्या पलिकडचे आहे. राहुल झोपडीसारख्या साधारण घरात राहतो, तो गरीब आहे, हे कळले तरीही जुलीने आपला निर्णय बदलला नाही. जुलीचे राहुलवरचे खरे प्रेम पाहून जुलीच्या घरच्यांनी या नात्याला होकार दिला आणि तिच्यासोबत राहुलला भेटायला बिहारच्या एका साधारण गावात आले. मिळालेल्या माहितीनुसार, बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील राजापूर गावचा रहिवासी असलेला राहुल यादव कामासाठी रशियाला गेला होता. तिथेच त्याची भेट जुलीशी झाली. सुरुवातीच्या भेटीनंतर त्यांच्यातील संवाद वाढला आणि हळूहळू त्यांच्या नात्याचे रूपांतर प्रेमात झाले. पुढे राहुल भारतात परतला, तरी त्यांचे नाते टिकून राहिले. हजारो किलोमीटरचे अंतर असूनही, एकत्र राहण्याची त्यांची इच्छा तसूभरही कमी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, जुलीचे प्रेम आणि या जोडप्याचा निर्णय पाहून कुटुंबातील ज्येष्ठांनीही या लग्नाला संमती दिली आहे. राहुल आणि जुली लवकरच विवाह करतील अशी अपेक्षा आहे; मात्र लग्नाची नेमकी तारीख किंवा इतर नियोजनाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. सर्व काही नियोजनानुसार घडल्यास, रशियामध्ये सुरू झालेली ही प्रेमकहाणी बिहारमधील लग्नाद्वारे एका नवीन टप्प्यावर पोहोचू शकेल.

आता रिक्षाही चालकविरहीत

भारतात सध्या 'टेस्ला'ची चांगलीच चर्चा आहे. अशातच या कारला टक्कर देणारी ड्रायव्हरलेस ऑटो रिक्षा भारतात लाँच झाली आहे. 'ओमेगा सेकी मोबिलिटी' (ओएसएम) ने भारतीय बाजारपेठेत जगातील पहिली इलेक्ट्रिक थ्री-व्हीलर लाँच केली असून 'स्वयंगती' असे या वाहनाचे नाव आहे. या रिक्षाचे बुकिंगही सुरू झाले आहे. प्रवासी प्रकाराच्या या रिक्षाची किंमत अंदाजे चार लाख आहे तर लॉजिस्टिक्स/कार्गो आवृत्ती लवकरच लाँच केली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. याची किंमत अंदाजे चार लाख १५ हजार रुपये असेल. ही रिक्षा बॅटरीवर चालते आणि सिंगल चार्जमध्ये १२० किलोमीटरपर्यंतची रेंज देते. यात 'ओएसएम' चा इलेक्ट्रिक प्लॅटफॉर्म आणि 'एआय'आधारित ऑटोनॉमसी सिस्टम आहे. 'स्वयंगती'मध्ये रिडर, जीपीएस, एआय-आधारित अडथळा शोधणे (सहा मीटर पर्यंत), मल्टी-सेन्सर नेव्हिगेशन आणि रिमोट सेफ्टी कंट्रोल आदी समाविष्ट आहे. या प्रणाली विमानतळ, तंत्रज्ञानयुक्त उद्याने, स्मार्ट कॅम्पस, औद्योगिक केंद्रे आणि गर्दीच्या भागात स्वायत्तपणे कार्य करण्यास वाहनांना सक्षम करतात. 'स्वयंगती'



भारतातील रहदारी आणि विविध भूप्रदेशांची स्थिती लक्षात घेऊन डिझाइन केली आहे. ती उच्चघनता, कमी-वेगवान रहदारी तसेच स्मार्ट शहरे, औद्योगिक क्षेत्रे आणि वाहतूक केंद्रांसाठी आदर्श आहे. पूर्णपणे इलेक्ट्रिक असल्याने त्यात शून्य टेलपाइप उत्सर्जन आणि कमी ऑपरेटिंग खर्च अंतर्भूत आहे.

या ऑटोची तीन किलोमीटरच्या स्वायत्त मार्गावर पहिल्या टप्प्यातील चाचणी आधीच पूर्ण झाली असून त्यामध्ये सात थांबे, रिअल-टाइम अडथळा शोधणे आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय सुरक्षित प्रवासी हालचाल यांचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात नियंत्रित वातावरणात व्यावसायिक रोलआउट सुरू होईल. 'स्वयंगती' हे केवळ उत्पादन लाँचिंग नाही तर भारतीय वाहतुकीच्या भविष्यातील हे एक मोठे पाऊल आहे. स्वायत्त वाहने आता भविष्याची कल्पनारम्य राहिलेली नाहीत तर वर्तमानाची गरज आहेत. आम्ही दाखवून दिले आहे, की भारत जागतिक ट्रेंडचे अनुसरण करण्याऐवजी त्यांचे नेतृत्व करू शकतो,' असे कंपनीचे संस्थापक आणि अध्यक्ष उदय नारंग यांचे म्हणणे आहे.



रेल्वे स्टेशनवर औषधाचे दुकान का नसते?

रेल्वे फक्त प्रवासाचं एक साधन नसून खऱ्या अर्थानं भारतामध्ये अनेकांची ती जीवनवाहिनी आहे. देशाच्या बहुतांश भागांमध्ये रेल्वेच्या जाळ्याचा विस्तार झाला असून दळणवळणाचं हे साधन विकासामध्ये मोलाचा हातभार लावत आहे.

भारतीय रेल्वेनं प्रवास करणं म्हणजे एक खास अनुभव आहे. राज्य, प्रांत बदलत पुढे जाणारा हा प्रवास फक्त नव्या स्थानकांवरच पोहोचवत नाही तर वेगळ्या संस्कृतीपर्यंत पोहोचण्यास सुद्धा मदत करतो. रेल्वे एखाद्या स्थानकावर थांबली असता सहज बाहेर डोकावलं की दुकानं दिसतात. कुठं अल्पोपहार मिळतो, कुठं फक्त पाणी मिळतं तर कुठे वाफाळता चहा विकला जातो. रेल्वे स्थानकांवर फळं आणि भेळसुद्धा मिळते. मात्र तुम्ही एक गोष्ट कधी विचारात घेतली का? रेल्वे स्थानकावर औषधांचं दुकान अर्थात मेडिकल स्टोअर मात्र कधीच नसतं. असं का?

औषधांची विक्री हे सोपं काम नाही. त्यासाठी काही कायदेशीर नियम आणि अटीशर्थींचं पालन करणं अपेक्षित असतं. शिवाय औषधं ठराविक तापमानात, सुरक्षित स्थळी ठेवणं अपेक्षित असतं. औषधे विक्रेत्यांच्या दुकानावर एक परवानाधारक फार्मासिस्ट असणं गरजेचं असतं. रेल्वे स्थानकासारख्या गर्दीच्या ठिकाणी या नियमांचं पालन सहसा होत नाही किंवा ते करणं आव्हानात्मक असतं. इथं बनावट औषधांची विक्री होण्याचा मोठा धोका असतो. शिवाय काही औषधांचा गैरवापर होणंही संभवतं. ज्यामुळे सहसा रेल्वे स्थानकांवर, फलाटांवर मेडिकल स्टोअर नसतात. आणखी एक कारण म्हणजे बाजारातील दरांपेक्षा रेल्वे स्थानकावर काही गोष्टींचे दर अधिक असतात. यामध्ये प्रवासभाडं आणि इतर गोष्टींची रक्कमही जोडली जाते. औषधांच्या बाबतीत कायदेशीररित्या तसं करणं गुन्ह्यास पात्र ठरतं. बहुतांश प्रवासी सवयीनुसार सोबत औषधांचा साठा बाळगतात. त्यामुळं बऱ्याचदा अशा मेडिकलना तोटा सोसावा लागतो. म्हणूनही रेल्वे स्थानकांवर मेडिकल नसतात.

अर्थात मेडिकल स्टोअर नसले तरीही रेल्वे स्थानकांवर फर्स्ट एड रुम मात्र असते. जिथं प्रशिक्षित वैद्यकिय कर्मचारी आणि डॉक्टर प्रवाशांच्या सेवेसाठी हजर असतात. आपात्कालिन परिस्थितीत इथं प्रवाशांना प्रथमोपचाराची सुविधा पुरवली जाते. परिस्थिती गंभीर असल्यास रुग्णाला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयातही पाठवण्याची व्यवस्था केली जाते.

प्रयोग म्हणून चालवली बाईक टॅक्सी

आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांचे आयुष्य म्हणजे ऑफिस, लॅपटॉप, टार्गेट्स आणि डेडलाईन्स, असे चित्र अनेकदा पाहायला मिळते; मात्र पुण्यातील दोन 'सॉफ्टवेअर इंजिनीअर्स'ची एक वेगळीच कहाणी सध्या 'सोशल मीडिया'वर चर्चेचा विषय ठरली आहे. महिन्याला एक लाख रुपयांपेक्षा अधिक पगार मिळत असतानाही हे दोघे तरुण 'वीकेंड'ला चक्क 'रॅपिडो बाईक' टॅक्सी चालवत आहेत. विशेष म्हणजे, त्यांनी काही तासांमध्ये केलेली कमाई आणि त्यामागचे कारण ऐकून अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

'एक्स' या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर नंदकिशोर नावाच्या पुण्यातील सॉफ्टवेअर डेव्हलपरने आपल्या दोन रूममेट्सबद्दलची माहिती शेअर केली. त्याच्या पोस्टनुसार, हे दोघेही चांगल्या कंपन्यांमध्ये 'सॉफ्टवेअर इंजिनीअर' म्हणून काम करतात. त्यांचे वार्षिक पॅकेज १२ लाख रुपयांपेक्षा अधिक असून, दोघांकडेही उत्तम स्पोर्ट्स बाईक्स आहेत. नियमित नोकरीतून चांगले उत्पन्न मिळत असतानाही या दोघांनी गेल्या 'वीकेंड'ला काहीतरी वेगळे करण्याचे ठरवले. त्यांनी 'रॅपिडो बाईक टॅक्सी रायडर' म्हणून नोंदणी केली आणि काही प्रवाशांना त्यांच्या इच्छित ठिकाणी पोहोचवले. नंदकिशोरने शेअर केलेल्या माहितीनुसार, 'रॅपिडो'वर काही तास काम केल्यानंतर एका तरुणाने ९०० रुपये, तर दुसऱ्याने ५०० रुपये कमवले. महिन्याला चांगला पगार मिळवणारे हे तरुण अतिरिक्त



उत्पन्नासाठी नव्हे, तर वेगळा अनुभव घेण्यासाठी बाईक टॅक्सी चालवत असल्याचे या पोस्टमध्ये म्हटले आहे. नंदकिशोरने आपल्या पोस्टमध्ये या अनुभवाबद्दल आश्चर्य व्यक्त केले. चांगली नोकरी आणि भरघोस पगार असतानाही तरुण वीकेंडला अशा वेगळ्या गोष्टी करून पाहतात, याची 'सोशल मीडिया'वर चर्चा रंगली आहे. या दोन्ही तरुणांचा हा निर्णय केवळ अतिरिक्त पैसे कमावण्यापुरता मर्यादित नसल्याचे दिसते. दररोजच्या ऑफिसमधील कामापेक्षा वेगळे काहीतरी करून पाहणे, नवीन लोकांना भेटणे आणि नेहमीच्या दिनक्रमातून बाहेर पडणे, हा त्यामागचा उद्देश असू आहे.

'एअर होस्टेस' विकते खेकडे!

तब्बल १२ वर्षे 'एअर होस्टेस'चे काम केल्यानंतर खेकडे विकण्याच्या व्यवसायात उतरलेली ही महिला आता 'सोशल मीडिया'वर चर्चेत आहे. जिओ चेन असे या महिलेचे नाव असून, सणासुदीच्या काळात तिच्या कुटुंबाच्या व्यवसायाने एका दिवसात एक लाख चिनी युआनपेक्षा अधिक विक्री नोंदवली. थोडक्यात ही महिला खेकडे विकून दररोज सुमारे १४.४५ लाख रुपये इतकी दणदणीत कमाई करते आहे.

जिओ चेन ही महिला चीनमधील झेजियांग प्रांतातील निंगबो शहरात राहते. चेन यांनी जवळपास १२ वर्षे 'एअर होस्टेस' म्हणून काम केले; मात्र त्यांच्या आईचा खेकडे विक्रीचा व्यवसाय वाढू लागला आणि कामाचा व्यापही वाढला. व्यवसाय सांभाळण्यासाठी मदतीची गरज असल्याने चेन यांनी नोकरी सोडून गावी परतण्याचा निर्णय घेतला. विमानातील प्रवाशांची काळजी घेण्याऐवजी आता त्या खेकड्यांची निवड, वर्गीकरण, पॅकिंग आणि ग्राहकांच्या ऑर्डर पाठवण्याच्या कामात मदत करतात. चेन



यांनी आपल्या व्यवसायाची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'सोशल मीडिया'चा वापर सुरू केला. खेकडे निवडण्यापासून ते पॅकिंग आणि ऑर्डर पाठवण्यापर्यंतच्या प्रक्रियेचे छोटे व्हिडीओ त्या शेअर करू लागल्या. यामुळे त्यांच्या व्यवसायाकडे ग्राहकांचे लक्ष वेधले गेले आणि ऑनलाइन ऑर्डर मिळण्यास मदत झाली.

चीनमध्ये सणाच्या काळात खेकड्यांची मागणी वाढते. याच हंगामात चेन यांच्या कुटुंबाच्या व्यवसायाने एका दिवसात एक लाख युआनपेक्षा अधिक विक्री केल्याचे वृत्त आहे. मात्र मोठ्या प्रमाणावर ऑर्डर मिळाल्या, तरी त्या पूर्ण करणे सोपे नव्हते. ग्राहकांना हवे असलेले चांगल्या दर्जाचे खेकडे पुरेशा प्रमाणात मिळवताना अडचणी येत होत्या. त्यामुळे मागणी वाढली, म्हणून प्रत्येक ऑर्डर स्वीकारण्याऐवजी, उपलब्ध मालाच्या गुणवत्तेला प्राधान्य देत विक्री मर्यादित ठेवण्याचा निर्णय चेन यांनी घेतला. विमानसेवेतील नोकरीत प्रवाशांशी संवाद साधणे, त्यांना माहिती देणे आणि त्यांच्या गरजा समजून घेणे महत्त्वाचे असते. चेन यांनी हाच अनुभव 'सोशल मीडिया'वर ग्राहकांशी संवाद साधताना आणि आपल्या उत्पादनांची माहिती देताना वापरला. आईच्या व्यवसायाला हातभार लावताना त्यांनी 'सोशल मीडिया'च्या मदतीने ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा नवा मार्ग निवडला. विशेष म्हणजे, वाढती मागणी आणि दर्जा टिकवण्याचे आव्हान यांचा समतोल साधणेही त्यांच्या व्यवसायाचा महत्त्वाचा भाग बनले आहे.

नोकरी गेली म्हणून...

एका २२ वर्षीय तरुणाची नोकरी गेल्यावर त्याच्या कुटुंबाचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. त्याच्या पालकांनी तर त्याला जन्म देणे हीच चूक होती, असेही म्हटले. रेडिटवरील एका सविस्तर पोस्टमध्ये या तरुणाने सांगितले, की अवघ्या सहा महिन्यांमध्येच त्याची 'आयटी' क्षेत्रातील नोकरी गेल्यामुळे त्याचे आयुष्य विस्कळीत झाले. त्याने नमूद केले, की दुसरी नोकरी शोधण्यात मदत करण्याऐवजी त्याचे पालक त्याला टोमणे, अपशब्द वापरू लागले. त्यामुळे त्याचे दैनंदिन जीवन असह्य झाले. या कठीण प्रसंगाने त्याला शिकवले, की कोणीही खऱ्या अर्थाने आपले नसते.



'रेडिट पोस्ट'मध्ये त्याने सांगितले, की त्याला आयटी क्षेत्रातील नोकरी मिळाली होती; पण सहा महिन्यांनंतर त्याला कामावरून काढून टाकण्यात आले. या २२ वर्षीय तरुणाने केले, की तो ९५ हजार रुपयांचा चांगला पगार मिळवत होता; मात्र आता तो बेरोजगार असून काहीही कमावत नसल्यामुळे, त्याचे कुटुंब त्याला एखाद्या ओझ्यासारखे वागवत आहे. त्याने सांगितले, की त्याला सर्वात जास्त वेदना तेव्हा झाली, जेव्हा त्याच्या ताटातील जेवण काढून घेण्यात आले आणि त्याला विचारण्यात आले, 'तुझा उपयोग काय? कदाचित तुला जन्म देणे हीच चूक होती.' त्याने सांगितले, की मुलाखतींची तयारी करत असतानाच तो सुरक्षा रक्षक म्हणून नाईट-शिफ्टच्या नोकरीच्या शोधात आहे; पण नशिबाने आपली साथ सोडल्याचे त्याला वाटते. 'रेडिट'वर या तरुणाने लिहिले, की तो दोन दिवसांपासून उपाशी आहे, तरीही त्याचे कुटुंब त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहे. भाड्याच्या इलेक्ट्रिक स्कूटरवरून अन्न पोहोचवण्याचा प्रयत्न मी केला; पण त्यामुळे मुलाखतींच्या तयारीसाठी मला वेळच उरला नाही.

अस्वलं झाली हिंस्त्र



हवामानबदल आणि माणसांच्या घुसखोरीमुळे ध्रुवीय अस्वलांच्या वर्तनात बदल झाल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या कारणामुळे ध्रुवीय अस्वलं नरभक्षी होऊ लागली आहेत. ही अस्वलं अन्नाच्या शोधासाठी लांबवर भटकू लागली आहेत. मनुष्याच्या संपर्कात येणारी अस्वलं त्यांच्यावर हल्लाही करू लागली आहेत. इतकंच नाही, तर अन्नाच्या कमतरतेमुळे ती एकमेकांना मारू लागली आहेत. भूक भागवण्यासाठी अस्वलं कोणत्याही थराला जायला तयार आहेत. रशियन शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. पिलांसोबत असणाऱ्या मादी अस्वलांवर नर अस्वलं हल्ला करत आहेत. जीवाश्म इंधनाच्या शोधासाठी बऱ्याच कंपन्यांनी आपला मोर्चा पृथ्वीच्या ध्रुवांकडे वळवला आहे. यामुळे ध्रुवीय अस्वलांच्या अधिवासावर परिणाम होऊ लागला आहे. तापमानवाढीमुळे उत्तर आणि दक्षिण ध्रुवांवरचा बर्फ वितळू लागल्यामुळे या अस्वलांपुढे बरीच आव्हानं उभी ठाकली आहेत. आपलं अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अस्वलं प्रयत्नशील आहेत. मोठ्या आकाराची अस्वलं लहानग्या पिलांना खाऊ लागली आहेत. ध्रुवीय अस्वलं बर्फाच्या खाली पाण्यात असणाऱ्या सील माशांची शिकार करून पोट भरतात. पण इथला बर्फ वितळू लागल्यामुळे सील मासांची संख्या रोडावली आहे. याचं कारणामुळे अस्वलं सैरभैर झाली आहेत. हवामानबदलाचे अत्यंत घातक असे परिणाम आपल्याला सोसावे लागत आहेत. हे बदल थांबवले नाहीत, तर या पृथ्वीवरचं मानवाचं अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'जेन. झी.'चा शॉपिंग ट्रेंड

आजच्या डिजिटल युगात शॉपिंगची पद्धत झपाट्याने बदलत आहे. 'जेन. झी.' साठी 'सोशल मीडिया' हे केवळ रील्स पाहण्याचे किंवा मित्रांशी संपर्क साधण्याचे माध्यम राहिलेले नाही. 'सोशल मीडिया' आणि 'एआय' चा वापर नवीन प्रॉडक्ट आणि ब्रँड शोधण्यासाठी केला जात आहे; मात्र याचा मोठ्या प्रमाणात वापर करत असले, तरी त्यावर ते आंधळेपणाने विश्वास ठेवत नाहीत. 'मॅकिन्से'च्या २०२६ मधील ग्राहक सर्वेक्षणावर आधारित अहवालातून 'जेन. झी' च्या शॉपिंगच्या सवयी आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरील विश्वासाबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

'मॅकिन्से'च्या 'स्टेट ऑफ द कंझ्युमर सर्व्हे'वर आधारित 'फ्रॉम लाइक्स टू बायज' या अहवालानुसार, 'जेन. झी' साठी नवीन ब्रँड आणि प्रॉडक्ट शोधण्याचे 'सोशल मीडिया' हे महत्त्वाचे माध्यम बनले आहे. एखाद्या प्रॉडक्टची माहिती मिळवणे आणि खरेदीपर्यंत पोहोचणे, या दोन्ही टप्प्यांमध्ये तरुण 'सोशल मीडिया'चा वापर करतात. याउलट, 'बेबी बूमर्स' अजूनही प्रत्यक्ष दुकानांवर अधिक अवलंबून आहेत. या अभ्यासासाठी मार्च आणि एप्रिल २०२६ मध्ये ९२९ 'जेन. झी.' तरुण आणि १४४८ 'बेबी बूमर्स' यांच्या उत्तरांचे विश्लेषण करण्यात आले. रिपोर्टनुसार 'जेन. झी.' सोशल मीडिया आणि 'जनरेटिव्ह एआय' चा मोठ्या प्रमाणावर वापर करते; मात्र उत्पादनाची माहिती मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक माध्यमांवर त्यांचा विश्वास 'बेबी बूमर्स'च्या तुलनेत कमी आहे.



खरेदी करण्यापूर्वी मित्र आणि कुटुंबीयांचा सल्ला, तज्ज्ञांचे मत तसेच सेल्स स्टाफकडून मिळणारी माहिती या स्रोतांवर दोन्ही पिढ्या विश्वास ठेवतात; मात्र या स्रोतांवर बेबी बूमर्सचा विश्वास 'जेन. झी.' पेक्षा अधिक आहे. याशिवाय ऑनलाइन सर्च, ब्रँडच्या अधिकृत वेबसाइट्स आणि ऑनलाइन स्टोअर्स यांनाही मध्यम स्वरूपाचे महत्त्व दिले जाते. 'सोशल मीडिया' आणि 'एआय' च्या तुलनेत यूट्यूब वरील माहिती आणि ऑनलाइन रिव्ह्यू यांच्यावर अधिक विश्वास ठेवला जातो. 'जेन. झी.' सोशल मीडियावर नवीन प्रॉडक्ट शोधत असली, तरी केवळ एखादी रील, पोस्ट किंवा 'एआय' ने दिलेली शिफारस पाहून लगेच खरेदी करण्याचा निर्णय घेत नाही. प्रॉडक्टबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी ते इतर स्रोतांचाही आधार घेतात.





मर्चंट्स को ऑप. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, चेअरमन हस्तीमल मुनोत, संजय चोपडा, आ. संग्राम जगताप, महापौर सौ. ज्योती गाडे आदी. (छायाचित्र : लहू दळवी)

शिस्तबद्ध कारभार आणि विश्वासार्हतेमुळे मर्चंटस बँक यशोशिखरावर

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन; सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांच्या मुदत ठेव पावतीचे वितरण

नगर – सहकारी बँकिंग क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या अहमदनगर मर्चंट्स को ऑप. बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना प्रत्येकी ५१०० रूपयांची मुदत ठेव पावती भेट दिली जात आहे. या मुदत ठेव पावती वितरणाचा ऐतिहासिक शुभारंभ सोहळा मंगळवारी यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील व मर्चंटस बँकेचे संस्थापक चेअरमन व विद्यमान ज्येष्ठ संचालक हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. संग्राम जगताप होते. ११ सभासदांना प्रातिनिधिक स्वरूपात ठेव पावती देण्यात आली.

याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, व्हाईस चेअरमन अमित मुथा, सुवर्ण महोत्सव वर्ष कमिटीने स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा, संचालक कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, प्रमिलाबाई बोरा, मिनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष बायड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया, सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, महिला व बालकल्याण अंतर्गत कमिटी सदस्या मनिषा गुगळे, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, मर्चंटस व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष अशोक गांधी, सेक्रेटरी संतोष बोरा, राजेंद्र गांधी, वारकरी संप्रदायाचे राऊत अण्णा, सतीश (बाबूशेठ) लोढा, माळीवाडा येथील श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, अशोक कानडे आदींसह आजी माजी नगरसेवक, सभासद, खातेदार, ठेवीदार, व्यापारी उपस्थित होते.

सहकारमंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, सहकारी चळवळीची सुरुवात अहिल्यानगर जिल्ह्यात झाली व ती पुढे देशभरात फोफावली. हस्तीमल मुनोत यांनीही सहकाराचे एक मोठे स्वप्न पाहून मर्चंटस बँक स्थापन केली. आज पन्नास वर्षांनंतरही बँक यशोशिखरावर दिमाखात उभी आहे. बँकेची भक्कम आर्थिक स्थिती आणि प्रगती पाहून खूप आनंद होतो. सातत्याने सभासदांना १५ टक्के लाभांश देणे ही सोपी गोष्ट नाही. हे काम मर्चंटस बँकेने करून दाखवले. योग्य कर्जवाटप करून अनेकांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यात या बँकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विश्वासार्हता हे या बँकेचे वैशिष्ट्ये आहे. चेअरमन संजय चोपडा यांची बँकेप्रती असलेली तळमळ खूप जवळून पाहिली. सर्व संचालक मंडळ अतिशय शिस्तबद्ध कारभार करून बँकेची प्रतिष्ठा जपत आहे.

आ. संग्राम जगताप म्हणाले, बँकांचे अस्तित्व विश्वासावर टिकून असते. कर्ज देताना खूप काळजी घ्यावी लागते. नगरमध्ये विश्वास आणि मर्चंटस बँक हे समीकरण पन्नास वर्षानंतरही कायम आहे. चेअरमन होताच संजय चोपडा यांनी सभासदांना ५१०० रूपये ठेव पावती देण्यासाठी विशेष प्रयत्न करून आज हा कार्यक्रम घेतला. बँक आणखी शिखरावर नेण्याचे काम सर्व संचालक मंडळ निश्चितपणे करेल असा विश्वास आहे.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी बँकेच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्याचे स्वप्न पाहिले होते. तेव्हापासून आवश्यक परवानग्या मिळवण्यासाठी प्रयत्न चालू केले. मी चेअरमन झाल्यावर प्राधान्याने हे काम हाती घेतले. आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे सतत पाठपुरावा केला व त्यांनी आवश्यक मंजुरी दिली. एक मोठे कार्य माझ्या हातून झाले हे माझे भाग्य आहे.

स्वागताध्यक्ष अनिल पोखरणा म्हणाले, बँकेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ३१ मार्च २०१४ पूर्वीच्या सभासदांना तब्बल चार कोटी ७५ लाख रुपयांच्या ठेव पावत्यांचे वितरण होणार आहे. बँकेचा सुवर्ण महोत्सवही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला होता. सभासदांना संस्मरणीय भेट देण्यासाठी आवश्यक मंजुरी मिळण्यासाठी संचालक मंडळाने निर्धारपूर्वक यासाठी पाठपुरावा केला. त्यामुळे आवश्यक परवानग्या मिळाल्या आणि आज खऱ्या अर्थाने हा ऐतिहासिक कार्यक्रम होत आहे.

संस्थापक हस्तीमल मुनोत यांच्या वतीने किशोर मुनोत यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, मर्चंटस बँकेच्या इतिहासातील हा सुवर्ण क्षण आहे. स्थापनेपासून विश्वास जपत शिस्तबद्ध कारभार करत बँकेने प्रगती साधली आहे. बँकेने यापूर्वी रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना २५०० रूपयांची ठेव पावती तर ४१ व्या वर्षानिमित्त ४१०० रूपयांची ठेव पावतीची भेट दिली होती. आता सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती देण्यात येत आहे, याचा विशेष आनंद वाटतो. बँकेच्या प्रदीर्घ यशस्वी वाटचालीत सर्व आजी माजी संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. भविष्यातही प्रगतीची हीच परंपरा कायम राखली जाईल असा विश्वास आहे.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानताना सांगितले की, सर्व पात्र सभासदांनी १ डिसेंबर २०२६ पासून आपल्या मुदत ठेव पावत्या बँकेच्या मार्केट यार्ड शाखेतून घेऊन जाव्यात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

केडगावच्या लिंक रोडवर खोलीमध्ये सुरु होता 'तिरट जुगार'

पोलिसांनी छापा टाकत १२ जणांना पकडले, रोकडसह लाखोंचा मुद्देमाल जप्त

नगर – केडगाव उपनगरातील लिंक रोड वर असलेल्या पोद्दार शाळेजवळ रमाजीनगर येथील एका खोलीमध्ये पत्यावर पैसे लावून तिरंट नावाचा हार-जितीचा जुगार खेळणाऱ्या १२ जणांना अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांच्या विशेष पथकाने २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पकडले आहे.

याबाबत पो.कॉ. सार्थक अडकित्ते (वय २३ वर्षे, नेमणूक अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकून तिरट जुगार खेळताना व खेळवताना १२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये काळू मारुती शिंदे (वय ४९, रा. पाईपलाईन रोड), झनकार मारुती साळी (वय ३६, रा. जुनी सांगवी पुणे, ह.रा. कामरगाव), अमरकांत पांडुरंग भापकर (वय ५७, रा. माळीवाडा), विठ्ठल नानाभाऊ सातपुते (वय ४९, रा. खातगाव टाकळी), भाऊसाहेब सिताराम भातकुडव (वय ५१, रा. श्रीकृष्णनगर, कल्याण रोड), हर्षवर्धन मनोज कांबळे (वय १९, रा. देवीरोड, केडगाव), शुभम निळकंठ लॉकलकर (वय ३०, रा. समतानगर, सावेडी), विनोद कैलास निस्ताने (वय ३२, रा. चर्चरोड, माणिकचौक), अनिकेत राजाराम लोंढे (वय ३६, रा. लोढेमळा, सोनेवाडी रोड, केडगाव), सलमान बशीर शेख (वय ३६, रा. समर्थनगर, बुरुडगाव रोड) व विशाल अश्वीनकुमार आनंद (वय ३२, रा. पटवर्धन चौक, नालेगाव) यांच्याविरुद्धही गुन्हा नोंद झाला आहे. विनोद तुकाराम मगर (वय ३९, रा. पोद्दार शाळेजवळ, रमाजीनगर, केडगाव) हा या प्रकरणातील क्लब मालक असल्याचे अहवालात नमूद आहे.

या कारवाईत ४६ हजार रुपये रोख रक्कम, तिरट जुगाराची साधने आणि ३ लाख रुपये किमतीचे मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी कोतवाली पोलीस स्टेशन येथे २४ नोव्हेंबर रोजी रात्री महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगरमध्ये २७ नोव्हेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन

नगर – विश्व हिंदू परिषदेच्यावतीने २७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते ५ या वेळ जनकल्याण रक्तकेंद्र, नालेगाव, अहिल्यानगर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बजरंग दलाच्या वतीने शहीद कारसेवक राम कोठारी व शरद कोठारी बंधूंच्या बलिदान स्मृतीस अभिवादन म्हणून आदरांजली वाहण्यात येणार आहे. या शिबिरात रक्तदात्यांनी सहभागी होऊन शहीद कारसेवकांना अभिवादन करावे व गजेंद्र सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यात हातभार लावावा व रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हामंत्री अनिल जोशी, प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, जिल्हाप्रमुख श्रीकांत नांदापूरकर, सह प्रमुख हरिभाऊ डोळसे, प्रखंड मंत्री बाली जोशी यांनी केले आहे.

नगर शहर परिसरात दुचाकी चोरांचा उच्छाद, २ दिवसात ३ दुचाक्या चोरल्या

नगर – नगर शहर आणि तालुक्यातील तीन वेगवेगळ्या भागांतून अज्ञात चोरट्यांनी २ दिवसांत तीन दुचाक्या चोरून नेल्याच्या घटना समोर आल्या आहेत. याप्रकरणी नगर तालुका, तोफखाना आणि एमआयडीसी पोलीस ठाण्यांत चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत टाकळी काझी येथील राहत्या घरासमोरून ४० हजार रुपये किमतीची पल्सर मोटरसायकल चोरीस गेली आहे. फिर्यादी ओंकार रेवणनाथ कांबळे (वय २६ वर्षे, रा. टाकळी काझी, ता. जि. अहिल्यानगर) यांची बजाज पल्सर २२० एफ मोटरसायकल (क्र. एमएच-१६-सीयू-७३९१) २० नोव्हेंबर रोजी रात्री ११ ते दिनांक २१ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान राहत्या घरासमोरून चोरून नेण्यात आली. याप्रकरणी २४ नोव्हेंबर रोजी दुपारी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दुसऱ्याघटनेततारकपूरबसस्थानकासमोरील पार्किंगमधून होंडा कंपनीची ड्रीमयुगा मॉडेलची काळ्या व पांढऱ्या पट्ट्याची मोटरसायकल (क्र.एमएच-१६-सीएन-१९५०) लंपास झाली आहे. याबाबत अजय अरुण कांबळे (वय २७ वर्षे, धंदा – मजुरी, रा. कोल्हेवाडी, जामखेड रोड, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांची साईदीप सह्याद्री हॉस्पिटल, तारकपूर बसस्थानकासमोर येथील पार्किंगमध्ये हँडल लॉक करून लावलेली मोटरसायकल २३ नोव्हेंबर रोजी दुपारी ३:२० ते ३:४० वाजण्याच्या दरम्यान चोरीस गेली. या प्रकरणी २४ नोव्हेंबर रोजी रात्री तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या घटनेत एमआयडीसी परिसरातील हॉटेल सावली पॅलेससमोरून सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड चोरून नेण्यात आली आहे. याबाबत अभिषेक रावसाहेब लांडे (वय २९ वर्षे, रा. खारे कर्जुने, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची रॉयल ब्लू रंगाची सुझुकी ॲक्सेस मोटरसायकल (क्र.एमएच-१६-सीडब्ल्यू-१६३०) २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६:३० ते रात्री ८:३० वाजण्याच्या दरम्यान हॉटेलसमोरून चोरीस गेली. या फिर्यादीवरून २४ नोव्हेंबर रोजी रात्री एमआयडीसी पोलीस ठाण्यातअज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शेंडी येथुन बुलेटची चोरी

नगर – नगर तालुक्यातील शेंडी येथील गरीब नवाज ऑटोमोबाईलसमोर उभी केलेली बुलेट मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शकील अहमद हाजी करीम खान (वय ५५ वर्षे, रा. हमीद पार्क, मुकुंदनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. २२ नोव्हेंबर रोजी रात्री ८:३० ते ८:५० वाजण्याच्या सुमारास शेंडी येथील गरीब नवाज ऑटोमोबाईलसमोर उभी असलेली त्यांची रॉयल इन्फिल्ड कंपनीची क्लासिक-३५० बुलेट मोटरसायकल (क्र. एमएच-१६-सीजे-८८८६) अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या फिर्यादीवरून २३ नोव्हेंबर रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ब) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल राजू सुद्रीक करत आहेत.

रात्रीच्या वेळी कंटेनर आडवून चालकास लुटणारी टोळी जेरबंद

दोघा आरोपींसह ६ लाख ६० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त

नगर – पारनेर तालुक्यातील पळशी फाटा परिसरात कंटेनर आडवून चालकास मारहाण करत रोकड व मोबाईल लुटल्याच्या प्रकरणात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोघांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली कार आणि मोबाईल असा एकूण ६ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २१ नोव्हेंबर रोजी फिर्यादी महादेव वसंत कांबळे (वय २९, रा. चापोली, ता. चाकूर, जि. लातूर) हे त्यांचा कंटेनर घेऊन पळशी फाटा (ता. पारनेर) येथून जात असताना अज्ञात आरोपींनी कंटेनरला कार आडवी लावली. त्यांनी कांबळे यांना मारहाण करत २० हजार रुपये रोख रक्कम आणि मोबाईल जबरीने चोरून नेला होता. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे आणि पोलीस अंमलदार अतुल लोटके, सोमनाथ झांबरे, अमोल आजबे, प्रकाश मांडगे, फुरकान शेख, प्रशांत राठोड व संभाजी कोतकर यांचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते.

२४ नोव्हेंबर रोजी गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे हा गुन्हा दत्तात्रय कळमकर (रा. पळवे बु., ता. पारनेर) याने साथीदारासह केल्याचे निष्पन्न झाले व तो शिरूर (जि. पुणे) येथे असल्याची माहिती मिळाली. पथकाने शिरूर येथे शोध घेऊन दत्तात्रय बाळासाहेब कळमकर (वय ३६, रा. विठ्ठलनगर फेज २, कचेरी पाठीमागे, शिरूर, जि. पुणे; मूळ रा. पळवे, ता. पारनेर) याला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीवरून त्याचा साथीदार आदेश दिलीप गट (वय २६, रा. वडुले, ता. पारनेर) याचा शोध घेऊन त्यालाही ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान पथकाने ६० हजार रुपये किमतीचे ३ मोबाईल आणि ६ लाख रुपये किमतीची हुंदाई कंपनीची आय-२० कार (क्र. एमएच १४-जेआर-२४८१) असा एकूण ६ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी पारनेर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

सोलापूर रोडवर तरूणाकडून तलवार जप्त; गुन्हा दाखल

नगर – सोलापूर रस्त्यावरील तुक्कड ओढा परिसरात घराच्या पाठीमागील गवतात लपवून ठेवलेली लोखंडी तलवार भिंगार कॅम्प पोलिसांनी जप्त केली. याप्रकरणी दीपक राजेश बेरड (रा. तुक्कड ओढा, सोलापूर रोड, अहिल्यानगर) याच्याविरूध्द भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अंमलदार रवींद्र टकले यांनी फिर्याद दिली आहे. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास तुक्कड ओढा येथील दीपक बेरड याच्या घराच्या पाठीमागील गवतात लोखंडी तलवार लपवून ठेवण्यात आल्याची बाब समोर आली. दीपक बेरड हा ही तलवार स्वतःच्या कब्जात बाळगताना मिळून आल्याने पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत लोखंडी तलवार जप्त केली आहे.

नगर तालुक्यातील ४४ गावांची ग्रामसुरक्षा यंत्रणा झाली ठप्प

ती तात्काळ कार्यान्वित करण्याचे पोलिसांचे पंचायत समितीसह ग्रामपंचायतींना पत्रे

नगर – नगर तालुक्यातील ग्रामीण भागात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि आपत्तीच्या काळात नागरिकांना तात्काळ सतर्क करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी 'ग्रामसुरक्षा यंत्रणा' सध्या अनेक गावांमध्ये बंद पडली आहे. नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकूण ६३ ग्रामपंचायतींपैकी केवळ १९ ग्रामपंचायतींमध्ये ही यंत्रणा सुरू असून, उर्वरित तब्बल ४४ ग्रामपंचायतींमध्ये शासकीय रक्कम वेळेत न भरल्याने ही यंत्रणा ठप्प झाली आहे. या पार्श्वभूमीवर नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी गटविकास अधिकारी तसेच संबंधित ग्रामपंचायतींच्या सरपंच, प्रशासक आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवून थकीत रकमेचा भरणा करून ग्रामसुरक्षा यंत्रणा तात्काळ कार्यान्वित करण्याचे आवाहन केले आहे.

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील सुरक्षिततेसाठी ग्रामसुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात अनेक नागरिक आपल्या सोयीनुसार शेतात घर बांधून एकट्या वस्तीवर राहत आहेत. सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता मालमत्तेची चोरी, दरोडा, जबरी चोरी, महिला व अल्पवयीन मुला-मुलींसंदर्भात घडणारे गुन्हे, तसेच गंभीर अपघात आणि आगीच्या घटनांचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते. अशा संकटाच्या किंवा गुन्ह्याच्या वेळी एकाच कॉलवर संपूर्ण गावातील नागरिकांना एकाच वेळी माहिती मिळून ते सतर्क झाल्यास संभाव्य अनर्थ व गुन्ह्यांना प्रभावीपणे आळा घालता येऊ शकतो, असे पोलिसांनी पत्रात नमूद केले आहे.

'या' ४४ ग्रामपंचायतींना पाठवली पत्रे

या यंत्रणेचे महत्त्व लक्षात घेऊन पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व ग्रामविकास अधिकाऱ्यांना तातडीने आदेश द्यावेत, अशी मागणी नगर तालुका पोलिसांनी केली आहे. या पत्राच्या प्रती संबंधित ४४ ग्रामपंचायतींच्या ग्रामविकास अधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या आहेत. यामध्ये अंबिलवाडी, अरणगाव, आठवड, बाबुर्डी घुमट, बाबुर्डी बेंद, बारदरी, भातोडी पारगाव, भोयरेपठार, बुरुडगाव, चिचोंडी पाटील, दशमीगव्हाण, देवगाव, देऊळगाव सिद्धी, गुणवडी, हिवरेझरे, हिवरेबाजार, कामरगाव, कौडगाव, खडकी, खांडके, कोल्हेवाडी, मदडगाव, मांडवे, माथणी, मठपिंप्री, मेहेकरी, नारायण डोह, नेसी, निमगाव वाघा, पारगाव भातोडी, पिंपळगाव लांडगा, राळेगण म्हसोबा, रांजणी, रतडगाव, सांडवे, सारोळा बद्दी, सारोळा कासार, शिराढोण, सोनेवाडी (पिं.लां), टाकळीकाझी, तांदळी वडगाव, उक्कडगाव, वडगाव तांदळी आणि वाटेफळ या गावांचा समावेश आहे.

ग्रामपंचायत कामगार सेनेच्या मेळाव्यात जिल्हा कार्यकारिणीची निवड

नगर– महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार सेना यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा जिल्हास्तरीय आढावा मेळावा पार पडला. विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या नेतृत्वाखाली तसेच संघटनेचे राज्याध्यक्ष विलास कुमारवार यांच्या मार्गदर्शनाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी संदीप बाळासाहेब शेलार, जिल्हा उपाध्यक्षपदी संदीप छत्तीसे, जिल्हा सचिवपदी आदेश शिणारे, जिल्हा कार्याध्यक्षपदी शिवाजी मेनगर, जिल्हा संपर्कप्रमुखपदी अनिल शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली.

या मेळाव्यामध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या, प्रलंबित मागण्या, सेवाविषयक अडचणी आणि कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडून शासनदरबारी प्रभावी पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. जिल्हा परिषदेमधील ग्रामपंचायत कर्मचारी १० टक्के भरती प्रक्रियेबाबत चर्चा करून पात्र कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या विविध प्रस्तावांचा तातडीने निपटारा करण्याबाबत पाठपुरावा व वसुली, उत्पन्न व लोकसंख्येची अट रद्द करण्यासंदर्भातील मागण्यांवर चर्चा, किमान वेतनवाढ आणि वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा, भविष्य निर्वाह निधी बाबत व कर्मचाऱ्यांच्या हक्कांबाबत चर्चा झाली.

तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत विचार विनिमय या सर्व प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास कुमारवार यांनी यावेळी व्यक्त केला.

या मेळाव्यास दयानंद येरंडे, जनार्दन मुळे, हर्षवर्धन पाटील, ठाकूरदास गव्हाणे, मंगेश चिचोलकर, प्रमोद भरणे, सुनिल मांडवी, संतोष कांबळे यांच्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे तालुकाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

अर्बन बँक रोडवरील
गाळा भाड्याने देणे आहे
9422711469

शॉप विकणे
पाईपलाईन रोडटच प्राईम लोकेशन
४०० स्क्वे. फुट शॉप विकणे आहे
9225800008
8624814351

पाहिजेत
नगर हॉटेलमध्ये बिलिंग काउंटरच्या कामासाठी हुशार व अनुभवी मुलगा पाहिजे
9065186565

पाहिजेत
आमच्या फर्निचर शोरुममध्ये भरती सुरु आहे
मेहनती व जबाबदार व्यक्ती (पु)
हेल्पर
अनुभव व कौशल्यानुसार पगार
विजय ट्रेडिंग कंपनी
तेलीखुंट, पॉवर हाऊस समोर, अ.नगर. मो.9881088885

पाहिजेत
फुल टाईम/ पार्ट टाईम
(समक्ष भेट द्या)
श्री स्वामी समर्थ एन्टरप्रायजेस
जुने कोर्ट मागे, गणपती वाडा, टांगेगल्ली, अहिल्यानगर
9322072449

फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी व निर्व्यसनी कारागीर पाहिजेत
* कारागीर – ४
* हेल्पर – ६
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२,एमआयडीसी, अहिल्यानगर
9822499210
9657646555

सावेडी परिसरात स्कूल कामासाठी
मावशी पाहिजे
8793907182

पाहिजेत
*वार्डबॉय- ४ | *मावशी -६ (८ तासाचे रु. १३०००/- पगार)
*नाईट करीता वॉचमन -२
हॉस्पिटलमध्ये काम केल्याचे अनुभव आवश्यक
संपर्क 9028240404

घर विकणे
योग्य किंमतीत दुमजली घर विकणे
बालिकाश्रम रोड, जाधव मळा तुलसीपार्कसमोर, लक्ष्मीमाता मंदिराजवळ
(एजंट क्षमस्व)
संपर्क ५ ते ८
9730292394

भाड्याने उपलब्ध
कॅप्टन राजाभाऊ कुलकर्णी मार्ग, जुना मंगळवार बाजार येथील मध्यवर्ती चौकात मोक्याचे लोकेशन उपलब्ध.
८०० चौ. फूट. तळमजल्यावरील गाळा व्यावसायिक / घरगुती वापरासाठी/ऑफिस, एजन्सी, क्लिनिक यांसाठी उपयुक्त
7770027505

पाहिजेत
स्वस्तिक घी डेपो
दुकानाच्या कामाकरिता
मुलगा – जागा २
(इंग्लिश व मराठी लिहिता वाचता येणे आवश्यक)
चितळे रोड, अहिल्यानगर
9823555553

पाहिजेत IFB
वॉशींग मशिन कंपनीच्या सर्व्हीस सेंटरसाठी
१०/१२ वी पास / ITI
मुले पाहिजेत
ऑफिस कामासाठी लेडिज कोर्डीनेटर पाहिजे
पत्ता : भिस्तबाग चौक, पवन नगर रोड, सावेडी, अ. नगर.
9146416002
9922855124

पाहिजेत
सिस्टर -२
रिसेप्शनिस्ट-२
मावशी -१
वहाडणे हॉस्पिटल
0241-2430411
9881513443

पाहिजेत
अहिल्यानगर शहरापासून जवळच असणाऱ्या ज्युनिअर कॉलेजसाठी
इंग्रजी, फिजिक्स, केमिस्ट्री या विषयांसाठी
शिक्षक / शिक्षिका पाहिजेत
या नंबरवर रिझूम पाठवा
9096970514
9004722330
येणे-जाणेची सुविधा उपलब्ध

पाहिजेत
एका नामांकित कॅफेसाठी
साऊथ इंडियन कूक : ४
कॉफी मेकर : ४
7057055199, 9604388607

रिलॅक्स होम सर्विस/ मसाज
प्रोफेशनल पद्धतीने घरी येऊन फुल बॉडी मसाज करून मिळेल, तसेच पॅरलेस झालेले पेशंट ची मसाज करून दिली जाईल (Full body massage) Head and foot मसाज मंथली पॅकेज मध्ये सुद्धा उपलब्ध,
वैशिष्ट्ये १) अनुभवी मसाजर २) होम सर्विस ३) मेल फीमेल स्टाफ अवेलेबल
9527066931

WALK-IN INTERVIEW
Candidate should have good knowledge of legal drafting & Other official work, with a minimum experience of 2–3 years with 40 speed of typing in english
Candidate should walk in interview with their CV on 1st of December, 2026" @ Time 10:30 AM onwards.
Adv. Sunil Harishchandre
Flat No 4, 1st Floor, Guruprasad Apart. Near Morya Mangal Karyalaya, Pipeline Road, Savedi, Ahilyanagar

अहमदनगरमधील एक्सक्लुझिव्ह फर्निचर शोरुमसाठी
पाहिजेत
सेल्स एक्सीक्युटिव्ह जागा ४
किमान १२वी/पदवीधर (M)
वय मर्यादा २५ ते ४० वर्ष अवश्यक
मिस्तरी फर्निचर फिटींग कामासाठी जागा ४
किमान २ ते ३ वर्षाचा अनुभव
वय मर्यादा २५ ते ४५ वर्ष अवश्यक
हेल्पर /स्वीपर जागा ४
वय मर्यादा २० ते ४० वर्ष
आर्जासह समक्ष भेटा. वेळ :स.११ ते ३
फर्निचर वर्ल्ड
हॉटेल प्रेमदान बेसमेंट, प्रेमदान चौक सावेडी, अ.नगर 9822266903

खालील पदांसाठी अनुभवी आणि फ्रेशर तात्काळ भरती करणे आहे
* एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी
* बी.एस्सी. केमिस्ट्री
* फूड टेक्नॉलॉजी टेक्निशियन
* स्टोअर मॅनेजर
* सिव्हिल/मेकॅनिकल इंजिनिअर
* ऑटोकॅड ड्राफ्ट्समन
* शेड्युलिंग मॅनेजर
* हाऊसकीपिंग कर्मचारी
* अकाउंटंट (फ्रेशर आणि अनुभवी)
* डिजिटल मिडिया मार्केटिंग
Ph Environmental Solutions
हॉटेल टेमो पुणे-नगर रोड, संदीप व्यायाम शाळेसमोर, केडगाव, अहिल्यानगर
info@phenvsolutions.com
8788136196
9422224374

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

किडनी विकार मोफत तपासणी शिबीर
शुक्रवार दि. २७-११-२०२६ * वेळ : सकाळी १० ते २
किडनीचे आजार –
* अंगावर सुज येणे, लघवी कमी/लाल होणे, किडनी जंतु संसर्ग, डायलेसिस इ. उपचार व निदान
तज्ञ डॉक्टर
डॉ. गोविंद कासट DM., Nephro
डॉ. प्राजक्ता पारधे Physician
* महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत 'डायलेसिस' मोफत केले जातील.
* सोनोग्राफी,रक्त, लघवी इ. तपासण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जातील.
तरी रुग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा.
एम.आर.आय. रू 2500/- रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट : संपर्क : 9404297411
डिजिटल एक्सरे रू. 250/- सोनोग्राफी रू. 950/- संपर्क :9405271878
सिटीस्कॅन रू. 1250/- संपर्क :9404299911
24 तास आपल्या दारात आपल्यासाठी ब्लड बँक
होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

अनुभवी मेकॅनिक पाहिजे
(जागा २)
• सर्व प्रकारच्या Motorcycles व Scooters च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचा अनुभव आवश्यक
• BS6 वाहनांचा अनुभव आवश्यक
• Electric Vehicles (EV) च्या सर्व्हिसिंग व दुरुस्तीचे ज्ञान
• सर्व प्रकारच्या टू-व्हीलरची कामे करण्याचा अनुभव आवश्यक
-उपलब्ध सुविधा -
2 Hydraulic Ramps / Air Compressor / Battery Charger / Washing Machine
पत्ता : मनमाड रोड, यशवंत कॉईलसमोर, अ. नगर
9422081922

THE MATRIX ACADEMY
ENTRANCE EXAMINATION CENTER
LL.B. · CET | B.B.A. | B.C.A.
LAW · CLAT | M.B.A. | M.C.A.
■ Expert Faculty
■ Comprehensive Study Mock Tests
LIMITED SEATS! ENROLL NOW!
AHILYANAGAR'S NO. 1 ACADEMY FOR MBA | MCA | LLM ENTRANCE EXAMS
Sr. No. 96, Market Yard Building, Mahatma Phule Chowk, Ahilyanagar - 414001
7517245777
7841045777

भावपूर्ण श्रद्धांजली

कष्टाने केला आयुष्याचा प्रवास
कार्याचा तुमच्या आजही सुवास
हरवले आधाररूपी छत्र
तुमच्या आशीर्वादाची
आम्हाला सदैव साथ
स्व.गं.भा.सुमन रोहिदास ताठे
दशक्रिया विधी
गुरुवार दि. २६/११/२०२६
ठिकाण-नागरदेवळे,अमरधाम, अहिल्यानगर
: दुःखांकित :
श्री.बाळासाहेब मारुती जाधव । श्री. अरुणराव मारुती जाधव
श्री. नारायण मारुती जाधव । श्री. रवींद्र विठ्ठलराव जाधव
समस्त जाधव परिवार न्यू टिळक रोड,अहिल्यानगर


थंडीचे कपडे... जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,सग व अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **अंजुम फैरोज शेख रा.प्लॉट नं. १८,मालिक शेतल कॉलनी, आयेशा मस्जिद जवळ,मुकुंदनगर अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर शॉप मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसारापोटी रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे. या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध,ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन – जिल्हा तुकडी अहिल्यानगर / अहमदनगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील डि.।। अहिल्यानगर / अहमदनगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर/अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **चाहुराणा बुद्रुक येथील टी.पी.स्कीम नं. ३ मधील फायनल प्लॉट नं. ५०/१ पैकी सब प्लॉट नं. ११ याचा ब्लॉक नं.के - १ + सब प्लॉट नं. १२ याचा ब्लॉक नं. के - २ यावर बांधलेली वाणिज्य व रहिवास अपार्टमेंट स्कीम सिटी आर्केड टॉवर्स यापैकी ग्राउंड फ्लोअरमधील - शॉप नं. ११ याचे कारपेट क्षेत्र ३२.९५ चौ.मी.याचे बिल्टअप क्षेत्र ३४.६८ चौ.मीटर ही दुकान/शॉप या मिळकतीबाबत. यांसी चतुःसिमा** –
पुर्वेस – मार्जिन व ९.०० मीटर रुंदीचा रस्ता
दक्षिणेस – शॉपनं. १२, पश्चिमेस – पॅसेज व शॉप नं.५
उत्तरेस – लॉबी, स्टेअरकेस,लिफ्ट नं.१ व २
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि.२५/११/२०२६
अहिल्यानगर/अहमदनगर.

अॅडव्होकेट
नाजीम अहमद इस्माईल शेख
कुरेशी फैजान फारुक
जुन्या कलेक्टर ऑफिससेजारी,डावरेगल्ली, अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

2025 अंतर्राष्ट्रीय सहकारिता वर्ष

हर काम देश के नाम
CANTONMENT BOARD OFFICE AHILYANAGAR
AMX Chowk, Camp Ahilyanagar-2414002 (Maharashtra)
Phone No. :- 0241-2326008 Fax No. 0241-2340739
Email : ahmednagrcantt@gmail.com Website : www.cbahmednagar.com
Ahilyanagar

E-TENDER NOTICE (II Call)

Online E-Tender form, NIT & Financial bid format are available on the CPP site https: //defproc.gov.in/nicgep/app Contractor/Bidders/Firms can see the above website time to time for any changes or information.

Sr. No.	Name of Works –Description of work (Maintenance period 24months from satisfactory completion of work for serial No. 01 to 03 & 05 to 08)	Approx. tender cost of work Rs.	Earnest Money Rs.	Cost of Tender Form in Rs
01	M & L annual repair/ maintenance & improvement to Drains in Cantonment area. (Under15th FC)	Rs.20,00,000/-	Rs.20,000/-	Rs.2,000/- +GST
02	Water Supply-Replacing/Main. of old pipe lines into 80/100mm CI Pipe lines in Civil (Under15th FC)	Rs.20,00,000/-	Rs.20,000/-	Rs.2,000/- +GST
03	Re-carpeting/ maintenance of Tar roads in Cantonment Area. (Under15th FC)	Rs.20,00,000/-	Rs.20,000/-	Rs.2,000/- +GST
04	Repair & maintenance of Bore wells/ Hand pumps in Ahilyanagar Cantonment area. (Under Cantt. fund)	Rs.7,00,000/-	Rs.7,000/-	Rs.1,000/- +GST
05	Maintenance of Cantonment fund buildings (Under15th FC)	Rs.20,00,000/-	Rs.20,000/-	Rs.2,000/- +GST
06	Maintenance work in Sy.No.76, Shopping Plaza (Under Cantt. fund) a)Maintenance of compound wall. b)Fixing of interlocking concrete paving blocks.	Rs.10,00,000/-	Rs.10,000/-	Rs.1,000/- +GST
07	Construction of Compound wall at Darewadi trenching ground, (Under15th FC)	Rs.48,00,000/-	Rs.48,000/-	Rs.3,000/- +GST
08	Maintenance of public group latrines (Under Cantt. fund)	Rs.7,00,000/-	Rs.7,000/-	Rs.1,000/- +GST

Publish date & Date of issue/ bid submission : 25-11-2026.
End date of submission : 09-12-2026.
For detailed information please refer CPPP site.

The Cantonment Board / Chief Executive Officer reserve the right to accept or reject any or all tenders without assigning any reason.

Disclaimer :- It is requested not to wait till last date for submission of bid. This office is not responsible for Complaints of Technical Problem at NIC side & Bidder side.

No. ANR/Main.Works/2026-27
Office of the Cantonment Board,
Ahilyanagar. Dated : 25-11-2026
0241-2326008(O)

Chief Executive Officer,
Ahilyanagar Cantonment Board,
(Vikash Kumar I.D.E.S.)

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **आरती रमेश शेलार रा.वरवंडे गल्ली,माळीवाडा, अहिल्यानगर** यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर मिळकतीचा आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा व्यवहार ठरला असून, विद्यमान मालक यांना सदर मिळकतीच्या खरेदीपोटी आमच्या अशिलाने विसार म्हणून रक्कम दिलेली आहे. विद्यमान मालक यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम व बोजा विहीत तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार व हितसंबंध नसल्याबाबतची खात्री व भरवसा दिला आहे. तथापि सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, तोंडी, अथवा लेखी करार, खरेदीखत,साटेखत, लिज, इजमेंट, मनाईहुकूम, बक्षीस, वारस हक्क, अटॅचमेंट, खासगी अथवा सरकारी, निमसरकारी बोजा असल्यास कोणत्याही स्वरुपात हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द होताच **७ दिवसांच्या** आत कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, असे समजून अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहित धरुन व सदर मिळकत ही निर्वेध, निर्जोखीम आहे, असे ग्राह्य धरुन आमचे अशिल हे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन- डि.अहिल्यानगर सब डिव्हीजन व तालुके अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **अहिल्यानगर शहर (अहिल्यानगर-१)** येथील वरवंडे गल्ली,माळीवाडा भागातील मिळकत खालील वर्णनाची-

सिटी सर्व्हे नंबर	क्षेत्रफळ
४४०५/१	८५.४० चौरस मीटर

ही संपूर्ण मिळकत व यावरील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र ६२.१० चौरस मीटर व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्र ४४.५२ चौरस मीटर असे एकूण बांधकाम क्षेत्र १०६.६२ चौरस मीटर यामधील इलेक्ट्रिक लाईट मीटर, लाईट फिटिंग व नळ कनेक्शनसह संपूर्ण मिळकत याबाबत. **यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे**
पूर्वेस – सिटी सर्व्हे नंबर ४४०५/२ व ४४०५/३, पश्चिमेस – सिटी सर्व्हे नंबर ४४०६
दक्षिणेस – सिटी सर्व्हे नंबर ४४३३, उत्तरेस – बोळ व रस्ता
येणेप्रमाणे चतु:सिमा पूर्वक मिळकत यामधील वाणगुकीच्या,वहिवाटीच्या येणे-जाणे हक्कासह काही एक राखून न ठेविता असे.

अॅड. सचिन सी. फुलसौंदर.
ऑफिस- तळ मजला, आनंद हाईट्स
जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर. मो. नं. ९९२२२२७१७८

दिनांक : 20 ते २६ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

SCREEN - 1
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)
रामायण
SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.30 PM 200/- (2D)

SCREEN - 2
ओम चॅप्टर-१
03.30 PM 150/-
06.30 PM 150/-
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दिनांक : २० ते २६ नोव्हेंबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे

SCREEN - 1
09.00 AM 200/- (3D)
01.00 PM 250/- (3D)
05.00 PM 250/- (3D)
09.00 PM 250/- (3D)
रामायण
SCREEN - 2
12.00 AM 200/- (2D)
09.00 PM 200/- (2D)
ओम चॅप्टर-१ SCREEN - 2 **बंधू (मराठी)**

09.00 PM 150/-
06.00 PM 150/-
आशा कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
स्क्वेअर
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर